जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## अहिल्याशक्ती बाईक रॅलीत महिला शक्तीचे सामर्थ्य व सक्षमतेचा जागर

नगर: 'जय जयकार करू अहिल्यादेवींचा' असे स्फूर्तीगीत, ढोल पथकाचे लयबद्ध वादन, पारंपरिक मराठमोळ्या वेशभूषेतील फेटेधारी लेकींचा प्रचंड उत्साह अशा वातावरणात अहिल्यानगरमध्ये 'अहिल्या शक्ती बाईक रॅली' संपन्न झाली. प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या साक्षीने अहिल्या सरस्वती महोत्सवाची शान वाढली. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, माजी स्थायी समिती सभापती सुवर्णा जाधव, दत्ता जाधव, मिनाताई सत्रे, व्याख्याते औदुंबर शिंदे, आरजे प्रसन्न, सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. अमोल जाधव, डॉ. प्राजक्ता जाधव, डॉ. सुमित नलवडे, सुजाता पायमोडे, गांधी, काकडे , किरण लोंढे आदी उपस्थित होते. ६०० हून अधिक युवती, महिलांनी या रॅलीत सहभाग नोंदविला.


प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या साक्षीने अहिल्या सरस्वती महोत्सवाची सुरुवात करताना आ. संग्राम जगताप समवेत महापौर ज्योतीताई गाडे, माजी स्थायी समिती सभापती सुवर्णा जाधव, दत्ता जाधव, मिनाताई सत्रे, औदुंबर शिंदे, आरजे प्रसन्न, डॉ. अमोल जाधव, डॉ. प्राजक्ता जाधव, डॉ. सुमित नलवडे, आदी.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्या सरस्वती महोत्सव हा स्त्री शक्तीचा गौरव आहे. आपल्या शहराला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिल्यापासून वातावरणात ऊर्जा निर्माण झालेली आहे. त्यांच्या विचारांचा जागर या महोत्सवातून होत आहे. तो महिला सक्षमीकरणाला अधिक बळकटी देणारा ठरेल. यासाठी डॉ. अमोल जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले पाहिजे.

महापौर ज्योतीताई गाडे यांनीही या महोत्सवात अहिल्यदेवींच्या लेकींना हक्काचे व्यासपीठ मिळाल्याची भावना व्यक्त केली. औदुंबर शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या देदीप्यमान कार्याचा प्रेरणादायी इतिहास उलगडून सांगितला. या महोत्सवाचे मुख्य आयोजक सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असून टायटल स्पॉन्सर महावीर ग्रुप (राजेश भंडारी) आहेत. कल्लाकार कट्टाची टीम संपूर्ण या मध्ये सहभागी आहे

स्वागत करताना डॉ. अमोल जाधव यांनी सांगितले की, अहिल्यानगरच्या समृद्ध परंपरेचा गौरव, महिला सक्षमीकरण, आत्म विश्वास आणि स्त्रीशक्तीचा जागर करण्याच्या उद्देशाने नगरमध्ये अहिल्या सरस्वती महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत 'अहिल्याशक्ती बाईक रॅलीला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. येथील उत्साह नगरच्या सांस्कृतिक, अध्यात्मिक संस्कृतीची प्रचिती देणारी आहे. या महोत्सवात दि.३० ऑगस्ट रोजी अहिल्यानगर फॅशन रनवे २०२६ रंगणार आहे. फॅशन रनवे बरोबरच अहिल्या गौरव पुरस्कार, सरस्वती गौरव पुरस्कार वितरण, प्रेग्नेंट लेडी वॉक, डॉक्टर्स वॉक, पॅरेंट ण्ड मी वॉक, डिझायनर फॅशन सिक्वेन्स होईल. याशिवाय महिला सक्षमीकरणावर आधारित नृत्य नाट्य आविष्कार सादर केली जाणार आहे. नगरची नवीन सांस्कृतिक ओळख या महोत्सवातून निर्माण होईल असा विश्वास आहे.

अहिल्या शक्ती बाईक रॅलीसाठी महिलांनी पारंपरिक वेशभूषा, अलंकार परिधान केले होते. काही महिला अहिल्यादेवींच्या वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या. सर्वांनी फुगड्यांसह पारंपरिक खेळाचा आनंद लुटला. बुलेटवर रूबाबदारपणे स्वार होत महिलांनी रॅलीचा आनंद लुटला. अनेकींनी आपली बाईक, स्कुटर अतिशय सुंदर पद्धतीने सजवल्या होत्या. शहराच्या विविध भागातून मार्गस्थ झालेल्या या रॅलीचे नगरकरांनी ठिकठिकाणी उत्षसाहातस्वागत करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि नगरच्या सांस्कृतिक वैभवाचा जागर केला. जुन्या बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीचा समारोप झाला.

## एमआयडीसीतील कंपनीत बॉयलरचा स्फोट होऊन कामगाराचा मृत्यू

नगर - एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत झालेल्या बॉयलर स्फोटात जखमी झालेल्या कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मोतीलाल दौलत वाघ (वय ६९, रा. चेतना कॉलनी, श्रीरंगनगर, नवनागापूर, अहिल्यानगर) असे मृत कामगाराचे नाव आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोतीलाल वाघ हे २० ऑगस्ट रोजी सकाळी ९.२१ वाजता एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत काम करीत होते. त्यावेळी कंपनीतील बॉयलरचा अचानक स्फोट झाला. या स्फोटामुळे त्यांच्या शरीरावर जखमा झाल्या होत्या. त्यानंतर जखमांमध्ये संसर्ग झाल्याने त्यांची प्रकृती गंभीर झाली. नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान २२ ऑगस्ट रोजी पहाटे १.३७ वाजता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची माहिती रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकार्यांनी एम आयडीसी पोलिसांना दिली. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

## रुक्मिणीबाई बारगजे यांचे दु:खद निधन



नगर - प्रेमदान हडको, सावेडी येथील रहिवासी रुक्मिणीबाई कृष्णा बारगजे (वय ६९) यांचे २४ ऑगस्ट रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ज्ञानेश्वर, हर्षद, मुक्ता यांच्या त्या मातोश्री होत.

## सुरेश गोफणे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - अष्टविनायक कॉलनी, पाईपलाईन रोड येथील रहिवासी सुरेश श्रीधर गोफणे (वय ७८) यांचे २० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. सुधीर, अमोल, नूतन यांचे ते वडील होत.

## सुधाकर चिलवर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - मोरया मंगल कार्यालय, आनंदवन कॉलनी, पाईपलाईन रोड येथील रहिवासी सुधाकर शिवलिंग चिलवर (वय ८५) यांचे २४ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी लिलावती चिलवर असा परिवार आहे.

## सिंधुबाई देसाई यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील रहिवासी गं.भा. सिंधुबाई बाबुराव देसाई (वय ७५) यांचे २२ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २३ ऑगस्ट रोजी वडाळा महादेव मंदिराजवळ अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सुशिलाबाई भळगट यांचे दु:खद निधन

राहुरी - धान्य बाजार रोड, प्रगती स्कुल जवळील रहिवासी श्रीमती सुशिलाबाई मणिकचंद भळगट (वय ८३) यांचे २४ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गणपती घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



डॉ. संजय माणिकचंद भळगट, सौ. संगीता सुनील गांधी, सौ. संध्या संजय देसाई, सौ. सीमा निर्मल गांधी, संजय भळगट यांच्या त्या मातोश्री होत.

## सरलाबाई गांधी यांचे हृदयविकाराने निधन

श्रीगोंदा - येथील रहिवासी सौ. सरलाबाई ताराचंद गांधी (पारगाववाला), (वय ७२) यांचे १७ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीगोंदा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. आदेश व संदेश गांधी यांच्या त्या मातोश्री होत.

## दिनकर जयदेवकर यांचे अल्प आजाराने निधन



मुंबई - बांद्रा, मुंबई येथील रहिवासी दिनकर शंकर जयदेवकर (वय ७०) यांचे २४ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ऋषिकेश जयदेवकर यांचे ते वडील होत.

## हिंद सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. अनंत फडणीस यांची निवड


हिंद सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधिज्ञ अनंत फडणीस यांची सर्वानुमते निवड झाल्यावर त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर - हिंद सेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधिज्ञ अनंत फडणीस यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष शिरीष मोडक यांच्या निधनाने रिक्त झालेल्या जागेवर अध्यक्षपदी ॲड. फडणीस यांची संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत सर्वानुमते नियक्ती करण्यात आली.

या बैठकीत संचालक अशोक उपाध्ये यांनी ॲड. अनंत फडणीस यांची अध्यक्षपदासाठी सूचना केली. त्यास जगदीश झालानी व डॉ. पारस कोठारी यांनी अनुमोदन दिले. सर्वानुमते निवड झाल्यावर संस्थेचे सचिव संजय जोशी व कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी ॲड. फडणीस यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी उपकार्याध्यक्ष अनंत देसाई, सारडा महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, प्रा. ज्योती कुलकर्णी. जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्रा. सुजित बेडेकर, रणजीत श्रीगोड, दिलीप शहा, सेवक प्रतिनिधी विठ्ठल उरमूडे, कल्याण लकडे, आदिनाथ जोशी, प्रा. गिरीश पाखरे, सहाय्यक सचिव योगेश देशमुख व सुनील सुसरे, कैलास बालटे आदी उपस्थित होते.

सत्कारास उत्तर देताना ॲड. अनंत फडणीस म्हणाले, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या निधनानंतर अध्यक्षपदाची सूत्र हाती घ्यावे लागतील असे स्वप्नातही कधी वाटले नव्हते. स्व. मोडक यांनी सुरु केलेले संस्थेच्या प्रगतीचे कार्य त्याच पद्धतीने पुढे नेणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल. सर्व संचालकांनी एकत्रितपणे काम करून संस्थेची प्रगती करू.

सचिव संजय जोशी म्हणाले, ॲड. अनंत फडणीस यांनी या आधीही दोन वेळा संस्थेच्या कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी उत्कृष्टपणे पार पडली आहे. कामाचा दांडगा अनुभव असलेले ॲड. फडणीस हे उत्कृष्ट काम करतील.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, स्व. शिरीष मोडक यांच्या निधनाने कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. तरीही त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन ॲड. अनंत फडणीस हे त्यांच्या प्रमाणेच संस्थेचा आदर्शवत कारभार पाहतील, असा विश्वास आहे. यावेळी रणजीत श्रीगोड, डॉ.पारस को ारी यांनीही मनोगतातून ॲड. फडणीस यांचे अभिनंदन केले.

## कॉलेज परिसरात विद्यार्थ्याला लोखंडी रॉडने बेदम मारहाण

नगर - नगर तालुक्यातील चास येथील एका कॉलेज परिसरात क्षुल्लक कारणावरून एका तरुणाला लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात तिघांसह इतर अनोळखी चार ते पाच जणांवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वडगाव गुप्ता येथील रहिवासी आदित्य बाबासाहेब शेळके (वय २१) हा विद्यार्थी २० ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास कॉलेज परिसरात थांबलेला होता. त्यावेळी वेदांत वाघस्कर (रा. भिंगार), संकेत झिने (रा. पिंपळगाव माळवी), अनिकेत बोरुडे आणि त्यांचे इतर चार ते पाच साथीदार तेथे आले. तू लय माजला का, शहाणा झाला का, असे म्हणत त्यांनी आदित्यला जाब विचारला. त्यावर मी काय केले, असे आदित्यने विचारताच आरोपींचा पारा चढला.

राग अनावर झालेल्या आरोपींनी लाकडी दांडके, लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी आदित्यला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याच्या पाठीवर, पोटावर आणि डोक्यावर गंभीर वार करण्यात आले. डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्त वाहू लागल्यानंतर, पुन्हा आमच्या नादाला लागला तर जीवे ठार मारू, अशी धमकी देत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

रक्तबंबाळ झालेल्या जखमी आदित्य शेळके याला तातडीने अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यानंतर आदित्यने दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी वेदांत वाघस्कर, संकेत झिने, अनिकेत बोरुडे व इतर अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शिंदे करत आहेत.


श्रमिकनगर येथील श्री श्रमिक बालाजी मंदिराच्या ३३ व्या वार्षिक महोत्सवानिमित्त बालाजी विवाह सोहळा साजरा करण्यात आला.

## श्री व्यंकटेश वरला कल्याणम सोहळा थाटात; सव्वा रुपयात एक जोडप्याचा सामुदायिक विवाह

नगर - श्रमिकनगर येथील श्री श्रमिक बालाजी मंदिराच्या ३३ व्या वार्षिक महोत्सवानिमित्त श्री व्यंकटेश वरला कल्याणम अर्थात बालाजी विवाह सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि थाटामाटात पार पडला. श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेच्या वतीने सव्वा रुपयात एक जोडप्याचा सामुदायिक विवाह संपन्न झाला. आतापर्यंत संस्थेच्या माध्यम ातून २१० सामुदायिक विवाह लावण्यात आले आहेत.

पहाटे पद्मशाली पुरोहित संघमच्या वतीने सुप्रभातम व जलघटाभिषेक करण्यात आला. त्यानंतर सत्यनारायण महापूजा, होमहवन व पूर्णाहुती विधी पार पडले. विवाह सोहळ्यापूर्वी श्रमिकनगर परिसरातून भगवान बालाजींची पालखी अर्थात वरात वाद्यांच्या गजरात काढण्यात आली. महिला भजनी मंडळी टाळांच्या निनादात सहभागी झाल्या होत्या. ठिकठिकाणी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

श्री व्यंकटेश वरला कल्याणम सोहळ्यात बालाजी कल्याणम चेतन सिरसुल, पद्मावती कल्याणम संजय रच्चा आणि लक्ष्मी कल्याणम व्यंकटेश अरकल यांनी सपत्नीक विधिवत पूजा करून बालाजी विवाहाचे धार्मिक विधी पार पाडले. यावेळी संपूर्ण मंदिर परिसर श्रीमन व्यंकटरमणा गोविंदा... गोविंदा! या जयघोषाने दुमदुमून गेला.

विवाह सोहळ्यासाठी जिल्ह्यासह राज्याबाहेरील भाविकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालाजी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मनोज दुल्लम, करण कराळे, आसाराम कावरे, पेशवाई क्रिएशनचे अमोल येमूल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रात संघचालक नानासाहेब जाधव, संभाजी कदम, विक्रम राठोड, नगरसेवक योगीराज गाडे, रविंद्र कटारीया, सतीश मुथ्था, क्लासिक व्हिलचे कुशल मुनोत आदी उपस्थित होते.

महोत्सवासाठी अध्यक्ष विनोद म्याना, उपाध्यक्ष अशोक इप्पलपेल्ली, सचिव राजू येमूल, सहसचिव ज्ञानेश्वर सुंकी, दत्तात्रय कुंटला, राजू गड्डम, कैलास लक्कम, शंकर येमुल, संजय पेगड्याल, नारायण यन्नम, शाम बोगा, शंकर बत्तीन, लक्ष्मीकांत नल्ला, कांतीलाल पतिपाका, अशोक बिटला, कुमार कोलपेक, बळीराम कोलपेक, दत्तात्रय इराबत्तिन तसेच सामुदायिक विवाह समितीचे किसनराव बोमादंडी, गणेश येमूल, नाना मादास आदींसह श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी परिश्रम घेतले.

## पत्रकारावर प्राणघातक हल्ला करून पसार झालेल्या ३ आरोपींना छत्रपती संभाजीनगर येथे पोलिसांनी पकडले


पत्रकारावर प्राणघातक हल्ला करून पसार झालेल्या ३ आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - सावेडी परिसरातील समतानगर येथे एका पत्रकार सुशील थोरात यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्या प्रकरणातील तीन सराईत आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर येथून शिताफीने ताब्यात घेतले आहे. हेमंत उर्फ सोनु दत्तात्रय कोहक (वय २७, रा.सनफार्मा शाळेसमोर, बोल्हेगाव), महेश उर्फ पप्पु दशरथ मते (वय २७, रा.नम्रता कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेडी), प्रशांत शिवाजी निक्रड (वय २५, रा.तागडवस्ती, पाईपलाईन रोड, सावेडी) अशी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत.

सुशील थोरात यांच्यावर २० ऑगस्ट रोजी सायंकाळी हा हल्ला झाला होता. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विकास जाधव, संदिप दरवडे व पोलीस अंमलदार संदिप पवार, योगेश भिंगारदिवे, अतुल लोटके, शाहीद शेख, राहुल द्वारके, फुरकान शेख, विजय ठोंबरे, सुनिल मालणकर, भगवान थोरात, प्रशात राठोड यांची दोन पथके करत होती.

तपास पथक आरोपीचा गोपनीय बातमीदारामार्फत,सीसीटीव्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना आरोपी हे राजगुरूनगर, पुणे शहर येथे असल्याची माहिती मिळाली पथकाने राजगुरूनगर, पुणे शहरात आरोपीचा शोध घेतला परंतु आरोपी तेथून पसार झाले. २४ ऑगस्ट रोजी गुन्हयातील आरोपी हेमंत उर्फ सोनु दत्तात्रय कोहक, हा त्याचे साथीदारासह वाळुंज, पंढरपूरजवळ एम आयडीसी परिसर, छत्रपती संभाजीनगर याठिकाणी असल्याची माहिती मिळाली.पथकाने मिळालेल्या माहितीवरून हेमंत उर्फ सोनु कोहक, महेश उर्फ पप्पु मते, प्रशांत निक्रड, यांना तेथून ताब्यात घेतले. या आरोपींना पुढील तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## भिंगारमध्ये तरुणाला काचेचा ग्लास फेकून मारला, एकावर गुन्हा दाखल

नगर - थट्टा-मस्करी केल्याच्या किरकोळ कारणावरून एका तरुणावर काचेचा ग्लास फेकून मारून त्याला जखमी केल्याची घटना भिंगार येथे घडली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत कुणाल भाऊसाहेब बारसे (वय २९, रा. पाटील गल्ली, भोईरे तालीम जवळ, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे मजुरीचे काम करतात. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी आठ वाजेच्या सुमारास ते भिंगार येथील महाराष्ट्र लस्सी सेंटरजवळ थांबले होते. त्या वेळी त्यांनी आरोपी इसराईल अफजल शेख (रा. सदर बाजार, भिंगार) याच्याशी थट्टा-मस्करी केली. या मस्करीचा राग आल्यामुळे इसराईल शेख याने कुणाल बारसे यांच्या दिशेने काचेचा ग्लास फेकून मारला. हा ग्लास लागल्याने कुणाल यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली. या घटनेनंतर कुणाल बारसे यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी इसराईल अफजल शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


विविध मागण्यांसाठी न्यायालय कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा निर्धार केला. यावेळी बैठकीस उपस्थित न्यायालयीन कर्मचारी. (छाया - लहू दळवी)

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### उच्च रक्तदाब : घरगुती उपाय

आजच्या धकाधकीच्या जीवनात उच्च रक्तदाब हा एक अत्यंत सामान्य आजार बनला आहे. पूर्वी हा आजार वृद्धांमध्ये दिसायचा, पण आता तरुण वयातही मोठ्या प्रमाणावर उद्भवतो. याला 'शांतपणे घात करणारा' म्हटले जाते, कारण बऱ्याचदा कोणतीही लक्षणे न दिसताच हा आजार शरीराचे नुकसान करत राहतो. जेवणात मिठाचे अतिसेवन, डबा बंद किंवा पॅकबंद अन्न, तेलकट पदार्थ आणि व्यायामाचा अभाव यामुळे लठ्ठपणा वाढून रक्तदाब वाढतो. नोकरीचा ताण, सततचा मानसिक दबाव, धूम्रपान, मद्यपान आणि अनुवंशिकता यामुळेही हा त्रास होतो. तसेच पुरेशी झोप न मिळाल्यामुळे शरीरावर ताण येतो. बऱ्याचदा याची लक्षणे जाणवत नाहीत, पण रक्तदाब जास्त वाढल्यास तीव्र डोकेदुखी, चक्कर येणे, अशक्तपणा, थोडेसे चालल्यावर दम लागणे, छातीची धडधड वाढणे, सतत चिडचिड होणे आणि काही वेळा नाकातून रक्त येणे अशी लक्षणे दिसतात. घरगुती उपायांमध्ये, दररोज सकाळी रिकाम्या पोटी लसणाची एक ते दोन कच्ची कळी चघळून खावी. रात्री पाण्यात भिजवलेले मेथीचे दाणे आणि त्याचे पाणी प्यायल्याने फायदा होतो. दररोज कोमट पाण्यात लिंबू पिळून प्यावे आणि रात्री झोपण्यापूर्वी अश्वगंधा चूर्ण कोमट दुधासोबत घेतल्यास मानसिक ताण कमी होतो. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जेवणात वरून मीठ घेणे टाळावे, बाजारातील खारट पदार्थ खाऊ नयेत. केळी, नारळ पाणी, संत्री आणि पालेभाज्यांचा आहारात समावेश करावा. दररोज तीस मिनिटे चालणे, योगासने आणि प्राणायाम करावा. ज्यांना हा त्रास आहे त्यांनी वर्षातून एकदा संपूर्ण तपासणी करून घ्यावी आणि डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे बंद करू नयेत.

## पाककला

### पनीर अंगारा

**साहित्य :** पनीर २५० ग्रॅम, दही १/२ वाटी, कांदा २ मध्यम बारीक चिरलेला, टोमॅटो २ प्युरी केलेली, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, हिरवी मिरची २ बारीक चिरलेली, काजू पेस्ट २ चमचे, कोळसा १ तुकडा, तेल २ चमचे, जिरे १/२ चमचा, हळद १/४ चमचा, तिखट १ चमचा, धने-जिरे पावडर १ चमचा, गरम मसाला १/२ चमचा, कसुरी मेथी १/२ चमचा, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, तूप १ चमचा

**कृती :** पनीरचे चौकोनी तुकडे करून घ्या. दही, अर्धा चमचा तिखट, मीठ आणि अर्धा चमचा गरम मसाला एकत्र करून त्यात पनीर १५ मिनिटे मॅरिनेट करा. कढईत तेल गरम करा. त्यात जिरे घाला. नंतर कांदा गुलाबी होईपर्यंत परता. आलं-लसूण पेस्ट आणि हिरवी मिरची घालून परता. टोमॅटो प्युरी, हळद, उरलेले तिखट, धने-जिरे पावडर आणि मीठ घालून तेल सुटेपर्यंत शिजवा. त्यात काजू पेस्ट आणि दही घालून २ मिनिटे परता. मॅरिनेट केलेले पनीर घालून हळुवार मिसळा. थोडे पाणी घालून ५ मिनिटे मंद आचेवर शिजू द्या. आता कसुरी मेथी आणि गरम मसाला घाला. वरून तूप सोडा. अंगारा देण्यासाठी एका लहान वाटीत गरम केलेला कोळसा ठेवा. त्यावर अर्धा चमचा तूप ओता. लगेच कढईवर झाकण ठेवून २ मिनिटे धूर बसू द्या. वरून कोथिंबीर पेरा. तयार पनीर अंगारा नान किंवा रोटीबरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### तर हे करा...

* ईशान्य हा भाग अत्यंत पवित्र मानला जातो. इथे टॉयलेट असल्यास गंभीर आजार, मानसिक तणाव, मुलांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतात.

* टॉयलेटचे दार नेहमी बंद ठेवा. शक्य असल्यास दाराच्या बाहेर एखादा पर्दा लावावा जेणेकरून तिथली नकारात्मक ऊर्जा बाहेर पसरणार नाही. टॉयलेटमध्ये एका काचेच्या वाटीत खडे मीठ भरून ठेवा. हे नकारात्मक ऊर्जा दूर ठेवते.

## सौंदर्य

चिमूटभर कस्तुरी हळद थोड्या कच्च्या दुधात मिसळून कापसाच्या मदतीने चेहऱ्याला लावा. १०-१५ मिनिटांनी चेहरा धुवून टाका. यामुळे त्वचेचा वर्ण उजळतो.

## सल्ला

* मायक्रोवेव्हमध्ये अन्नाचा वास येत असल्यास एका बाऊलमध्ये पाणी घेऊन त्यात लिंबाचे तुकडे किंवा व्हिनेगर टाका आणि मायक्रोवेव्ह ५ मिनिटे गरम करा. वाफेमुळे आतील दुर्गंधी निघून जाईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६

**भौमप्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, उ.षा.२२।५१, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** दिवस उत्तम, रखडलेली कामे मार्गी लागतील.

**वृषभ :** आरोग्याची काळजी घ्याल. खर्चावर नियंत्रण ठेवाल, वाद टाळाल.

**मिथुन :** नवीन संधी उपलब्ध होतील. मित्रांची साथ लाभेल. प्रवास घडेल.

**कर्क :** कौटुंबिक सौख्य लाभेल. मान-सन्मान वाढेल.

**सिंह :** कामात यश मिळेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. उत्साह कायम राहील.

**कन्या :** आरोग्याची काळजी घ्याल. मानसिक ताण तणाव जाणवेल.

**तूळ :** वैवाहिक जीवन सुखकर होईल. व्यवहारात लाभ होईल.

**वृश्चिक :** शत्रूंवर विजय मिळवाल. जुनी कर्जे फिटतील.


**धनु :** शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. प्रवास सुखकर होईल. मन प्रसन्न राहील.

**मकर :** संपत्तीचे व्यवहार पार पडतील. आईचे सहकार्य लाभेल. स्थैर्य येईल.

**कुंभ :** पराक्रम वाढेल. भावंडांचे सहकार्य लाभेल.

**मीन :** आर्थिक आवक वाढेल. गोड बोलून कामे साध्य कराल.

## शब्दगंध क्र. ७५०१ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) संत तुकाराम महाराजांचे गाव ३) काही तरी वाईट घडेल अशी भीतिकारक संभवना ५) वडिलांचा भाऊ; चुलता ७) वर्तुळ; कडे ९) थोडे; अल्प; म्हातारपण ११) अनेक वस्तू एकत्र करणे किंवा जमविण १४) वस्तूंची यादी १६) प्रयोजन; सबब; निमित्त १७) सुखदुःख जाणणारे अदृष्य इंद्रिय; माइंड १८) करंजीत वगैरे भरतात ते मिश्रण; बाखर १९) वर्ष; साल; शक २०) घरासमोरील मोकळी जागा २२) ओळख; वग २३) वाटा; हिस्सा २४) लहान डबा २५) सतत; अविरत; निरंतर

**उभे शब्द :-** १) एक जंगली व बहुउपयोगी वृक्ष २) हुलकावणी; बतावणी ४) रात्री चमकणारा एक कीटक ६) भोजनातील एक घटक ८) यज्ञकर्ता; मालक; पती १०) राज्यासंबंधीचे प्रश्न किंवा गुप्त मसलत १२) स्वत:ला (एक वचनी) १३) मृत्यू; देहावसान १५) दुर्दैवी; कपाळकरंटा १८) एक किमती इमारती लाकूड १९) उसंत; फुरसत २१) साथ; सोबत २३) ओझे; वजन; पेंढी

शब्दगंध क्र. ७५०० चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : इमानदार माणसाचे हात भलेही रिक्त असतील, पण त्याचे मन नेहमी समाधानी असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### फुग्यात पाणी भरून मेणबत्त्याजवळ धरल्यास तो का फुटत नाही?

लहान मुलांच्या मनात विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण करणारा आणि डोळ्यांवर विश्वास बसणार नाही असा हा एक अत्यंत रंजक प्रयोग आहे. सामान्यतः आपण पाहिले असेल की फुगा आगीजवळ किंवा मेणबत्त्याजवळ नेल्यास तो एका सेकंदात मोठा आवाज करून फुटतो. रबर अतिशय पातळ असल्यामुळे आगीचा स्पर्श सहन करू शकत नाही असा आपला समज असतो. परंतु, याच फुग्यामध्ये थोडेसे पाणी भरले आणि तो मेणबत्तीच्या ज्योतीवर धरला, तर आश्चर्यकारकपणे तो फुटत नाही. यामागे उष्णता आणि पाण्याच्या गुणधर्मांचे एक मजेशीर विज्ञान दडलेले आहे.

जेव्हा आपण रिकाम्या फुग्याखाली मेणबत्तीची ज्योत धरतो, तेव्हा ज्योतीची प्रचंड उष्णता थेट फुग्याच्या पातळ रबराला मिळते. रबर उष्णता पटकन शोषून घेते आणि अतिशय गरम होते. रबराची सहन करण्याची एक मर्यादा असते, ती ओलांडली गेली की रबर वितळते आणि हवेच्या दबावामुळे फुगा फुटतो. परंतु, जेव्हा आपण फुग्यात पाणी भरतो, तेव्हा पूर्ण परिस्थिती बदलते. जेव्हा आपण असा पाण्याने भरलेला फुगा मेणबत्तीच्या ज्योतीवर धरतो, तेव्हा मेणबत्तीची उष्णता फुग्याच्या रबरापर्यंत पोहोचताच रबर ती उष्णता स्वत:मध्ये रोखून धरत नाही. रबर ती उष्णता क्षणात त्याच्या आत असलेल्या पाण्याकडे हस्तांतरित करते.

येथे विज्ञानाचा मुख्य नियम कामाला येतो, तो म्हणजे पाण्याची उष्णता साठवून ठेवण्याची आणि शोषून घेण्याची क्षमता प्रचंड असते. पाण्याला उकळण्यासाठी किंवा तापवण्यासाठी खूप जास्त उष्णतेची आवश्यकता असते. त्यामुळे मेणबत्तीकडून येणारी सर्वच्या सर्व उष्णता पाणी स्वत:मध्ये शोषून घेत राहते. जोपर्यंत फुग्यातील सर्व पाणी कडक गरम होत नाही किंवा उकळत नाही, तोपर्यंत फुग्याचे रबर स्वतः जास्त गरम होत नाही. परिणामी, रबर वितळत नाही आणि फुगा आगीच्या संपर्कात असूनही अगदी सुरक्षित राहतो.

याचे अगदी साधे उदाहरण म्हणजे आपण रोजच्या स्वयंपाकात पाहतो. आपण चहा करण्यासाठी किंवा भात शिजवण्यासाठी जेव्हा धातूचे पातेले चूलीवर किंवा गॅसवर ठेवतो, तेव्हा आगीच्या संपर्कात असूनही ते धातूचे भांडे लगेच जळत नाही किंवा वितळत नाही.

कारण आतील पाणी किंवा अन्नपदार्थ सतत उष्णता शोषून घेत असतात. अगदी तसेच हे फुग्याचे आणि पाण्याचं गणित आहे. हा प्रयोग घरी करून पाहणे अतिशय सोपे आहे. यासाठी एक फुगा घेऊन त्यात साधारण अर्धा कप पाणी भरावे आणि उरलेला फुगा हवेने फुगवून त्याची घट्ट गाठ बांधून घ्यावी. आता फुग्याला उलटे करून त्याचा खालचा भाग, जिथे पाणी जमा झाले आहे, तो एका पेटवलेल्या मेणबत्तीच्या ज्योतीवर हळूच धरून ठेवावा. तुम्ही पाह्याल की फुगा आगीच्या अगदी जवळ असूनही आणि काळा होत असूनही फुटत नाही. मात्र, हा प्रयोग करताना एक काळजी घ्यावी लागते, ती म्हणजे फुग्याचा वरचा भाग जिथे फक्त हवा भरलेली आहे, तो जर चुकून आगीवर धरला तर फुगा एकाच क्षणात फुटतो. विज्ञानाचा हा प्रयोग मुलांना शिकण्यासाठी खूप आनंददायी आणिज्ञानाचा प्रसार करणारा ठरू शकतो.

## खरा आनंद

एका गावात राहुल आणि सोहन नावाचे दोन मित्र राहत होते. दोघांनाही तरुण वयातच आयुष्यात मोठी मजा करायची होती, पण त्यांचे मार्ग वेगवेगळे होते. राहुल शहरात गेला आणि त्याने तिथे मौजमजेसाठी दारू आणि सिगारेटचे व्यसन जडले. तो रोज मित्रांसोबत पार्टी करायचा, सिगारेटच्या धुरात स्वतःला हरवून जायचा आणि आरशात स्वतःची फॅशनेबल स्टाईल बघून खुश व्हायचा. सोहन मात्र गावातच राहिला. त्याने कसलेही व्यसन न करता रोज सकाळी मोकळ्या हवेत चालणे, कसरत करणे आणि आई-वडिलांच्या कामात मदत करणे ही सवय ठेवली. सुरुवातीला राहुलला पाहून लोकांना त्याचे झगमगाटी आयुष्य भारी वाटायचे, तर सोहन साध्या राहणीत जगायचा.

मग एक दिवस गावात अचानक गंभीर आर्थिक संकट आले. राहुल ज्या श्रीमंत मित्रांसोबत व्यसन करायचा, त्यांनी कठीण काळात राहुलला ओळखण्याचेही नाटक केले नाही. व्यसनामुळे राहुलची तब्येत खालावली, त्याच्याकडचे सगळे पैसे संपले आणि शरीर पूर्णपणे पोखरले गेले. तो उपचारासाठी सोहनकडे मदतीला धावला. सोहनने कोणताही विचार न करता आपल्या बचतीमधील पैसे आणि स्वतःचे रक्त देऊन राहुलचे प्राण वाचवले.

संकट ओसरल्यावर राहुलची मान शरमेने खाली गेली. त्याला समजले की, देखाव्यासाठी आणि क्षैंकि आनंदासाठी लावलेली व्यसने माणसाला आतून पोखतात, पण संकटाच्या वेळी कोणतीच वाईट सवय कामी येत नाही, तर संकटाशी लढण्यासाठी निरामय आणि व्यसनमुक्त शरीरच कामी येते. त्या दिवशी राहुलने व्यसन कायमचे सोडले आणि सोहनसारखे साधे पण ताठ मानेचे आयुष्य जगण्याचा निश्चय केला.

बोध : फक्त क्षुल्लक आनंदासाठी आणि देखाव्यासाठी लागलेली व्यसने संकटकाळात माणसाला पूर्णपणे हतबल करतात. खरी ताकद व्यसनमुक्त आणि निरोगी शरीरात असते, जी संकटाच्या वेळी स्वतःला आणि इतरांना वाचवू शकते.

## आत्मशक्ति



### परमात्मा आणि सत्संग

दांपत्याच्या मिलनप्रसंगी मिळणाऱ्या आनंदाशी केलेली आहे. आत्मा आणि परमात्मा यांचे कधीही न संपणारे ऐक्य आणि प्रेम यांची तुलना प्रियकर आणि प्रेयसीच्या प्रेमसंबंधांशी किंवा पति-पत्नीच्या भावबंधांशी अथवा अविनाशी पत्नीच्या प्रगाढ संबंधांशी केलेली आहे व समजावली आहे. संत मीराबाई ईश्वराला आपला पति मानत होती. तिने म्हटले आहे, मीराबाई सदा सुहागिन वर पाया अविनाशी ।आत्मा आणि परमात्मा ह्यांच्या ऐक्याच्या आनंदाची, धुंदीची तुलना संतांनी पति-पत्नीच्या मिलनाशी केलेली आहे.

उदाहरणार्थ अविलाची ख्रिस्ती संत टेरेसा ह्यांच्या बहुतेक लेखात त्यांनी आत्मिक आनंद अनुभवत्याचे वर्णन आलेले आहे. त्या आपल्या पुस्तकात अकराव्या अध्यायात ह्या आनंदाबद्दल म्हणतात - ह्या जगातील आनंद हा केवळ इंद्रियांच्या स्तरावरच राहतो मात्र आत्मिक आनंद आमच्या हाडामासात भिनतो.

संत कबीर आत्मा आणि परमात्मा ह्यांच्या मिलनाच्या धुंदीचे वर्णन करतात. प्रीति जो लागि धुलि गई, पैठि गई मन माहिं । रोम रोम पिड करै, मुख की सरधा नाहिं ।आणि कबीर प्याला प्रेमका, अंतर लिया लगाय ।। रोमरोम में रमि रहा, और अमल क्या खाय ।।जेव्हा लोक संतांची ही वाणी ऐकतात व वाचतात, तेव्हा त्यांना वाटते की, ते प्रियकर प्रेयसीच्या संबंधांचे वर्णन करीत आहेत. खरे तर ह्या उदाहरणाने संत आमचे लक्ष आत्मा व परमात्मा ह्यांच्या ऐक्याकडे वेधण्याचा प्रयत्न करतात. कारण त्या वास्तविक अनुभवाचे शब्दात वर्णन करणे अशक्य असल्याने ते प्रियकर प्रेयसीच्या प्रेमसंकैताद्वारे आत्म्याचे परमेश्वराशी मिलन कसे घडते हे समजावण्याचा प्रयत्न करतात.जर्मनीचे ख्रिस्ती रहस्यवादी माइस्टर एकार्हट म्हणतात- आत्मा आणि परमात्म्याच्या मिलनाचा जेव्हा मी विचार करतो तो प्रभू आत्म्याला आनंद विभोर करतो, कारण तो अन्य कशानेही समाधान

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ज्ञानाचा आधार

सुरेश ओबेरॉय : ती माहिती कोणी दिली आणि कोणत्या आधारावर दिली हे आपल्याला माहीत नसतं. कदाचित त्यांचं एखादं उत्पादन विकण्यासाठीही दिलेली असू शकते.

शिवानीदीदी : शक्य आहे. आजकाल आपल्या पालकांनी दिलेला सल्ला आणि आपल्याला इतर माध्यमांमधून मिळणारी माहिती या दोन्हीतली तफावत वाढत आहे. आपल्या पालकांच्या सल्ल्यांकडे आपण जुनेपुराणे म्हणून बघतो. त्यांचं ज्ञान हे आपल्या पर्यावरणावर आणि संस्कृतीवर आधारित आहे हे आपण विसरतो. पिढ्यानुपिढ्या लाभदायक प्रज्ञा हस्तांतरित केली जात आहे.

सुरेश ओबेरॉय : आजकाल मुलांना वाढवताना मदत व्हावी म्हणून पालक मदतनीस ठेवतात. पण आपल्या सहज ज्ञानाच्या आधारे वागणं कधीही चांगलं.

शिवानीदीदी : आपल्या आयुष्यातली स्पंदनांची भूमिका समजणं सर्वात महत्त्वाचं आहे. कधीकधी नियुक्त केलेले मदतनीस बाळाला वाढवण्यात तरबेज असतात आणि कदाचित आजीआजोबांमध्ये तेवढी शारीरिक ताकद नसते. पण बाळाला वाढवण्यासाठी, आत्म्याचं संगोपन करण्यासाठी बाह्य परिपूर्णतेपेक्षाही आपल्याकडे योग्य स्पंदनं असण्याची गरज आहे.

सुरेश ओबेरॉय : प्रेमाची स्पंदनं.

शिवानीदी : आईने बनवलेला पदार्थ आणि बाहेर हॉटेलमध्ये बनवलेला पदार्थ ह्यांमध्ये काय फरक असतो? स्पंदनांचा. आई घरी प्रेमाने स्वयंपाक करते. बाहेर जे पदार्थ आपण खातो ते पैसे मिळवण्याच्या हेतूने शिजवलेले असतात आणि त्या पदार्थांमध्ये तशीच स्पंदनं असतात.

सुरेश ओबेरॉय : बाळाला खुर्चीत बांधून ठेवून त्याला भरवणारी मदतनीस मी पाहिली आहे. ते बाळ एकसारखं रडत होतं आणि त्याला मोकळं हवं होतं पण ती त्याला सोडत नव्हती. बाळाची आई बाळाला नीट भरवलं नाही म्हणून रागवेल याची तिला भीती वाटत होती. त्या मदतनिसाचा हेतू फक्त तिच्या मालकिणीच्या सूचनेप्रमाणे वागणं हा होता. त्यामुळे त्या क्षणी तिला बाळाबद्दल प्रेमही वाटलं नाही आणि त्या अन्नाचा बाळावर काय परिणाम होईल हेही तिला समजलं नाही. (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : तुम्ही मला एवढं कसं काय प्रेम करता हे सिद्ध करा?

नवरा : अगं, मी ऑफिसमधून घरी येताना रस्त्यात ट्रॅफिकमध्ये अडकतो, तेव्हा बायकांचे फोटो बघण्याऐवजी मी फक्त तुझाच फोटो बघत बसतो!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रशियामध्ये राजेशाहीचा अंत होऊन अंतरिम सरकार कधी स्थापन झाले? - फेब्रुवारी १९१७

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## नागली

तर शास्त्रीय भाषेत 'एलुसाईन कोराकॅना' या नावाने ओळखली जाणारी नाचणी (नागली) 'पोएसी' कुळातील आहे. नाचणी धान्य दिसायला मोहरीप्रमाणे दिसते. नाचणी या वनस्पतीच्या रोपांना कणसे येऊन त्यातील दाण्यांना नाचणी असे म्हणतात. हेच दाणे खाद्यस्वरुपातील धान्य असून, त्याचाच उपयोग भाकरी, आंबील, पापड, लाडू बनविण्यासाठी केला जातो.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : नाचणी तुरट, मधुर रसात्मक, मधुर विपाकी व शीत वीर्यात्मक आहे. हीच नाचणी पित्त व रक्तशामक असून, स्तंभक व तर्पण गुणाची आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : नाचणीमध्ये चुनखडी, लोह, स्फुरद, गंधक, आयोडिन, 'अ' व 'ब' जीवनसत्त्व असते. त्याचबरोबर प्रथिने, खनिजे, आर्द्रता, तंतुमय व पिष्टमय पदार्थ यांचाही साठा विपुल प्रमाणात असतो.

उपयोग : १) नाचणी चुनखडीने समृद्ध असते. इतर कोणत्याही धान्यात नाचणीइतके चुनखडी नसते, म्हणून मुलांच्या निकोप वाढीसाठी त्यांच्या आहारामध्ये नाचणीपासून बनविलेल्या विविध पदार्थांचा वापर करावा. यामुळे त्यांचे दात, हाडे, स्नायू यांची घडण चांगली होऊन मुले सुदृढ व निरोगी बनतात.

२) नाचणीमध्ये चुनखडी, लोह व 'ब' जीवनसत्त्वाचा साठा भरपूर प्रमाणात असल्याने गर्भवती व बाळंतिणीच्या आहारामध्ये तिचा वापर नियमित करावा. बाळाच्या पोषणामुळे गर्भवतीला व बाळंतिणीला शरीरामध्ये कायम चुनखडीची कमतरता भासते. ही कमतरता भरून काढण्यासाठी व हाडांची झीज रोखण्यासाठी आहारामध्ये कायम नाचणीची भाकरी गायीचे साजूक तूप लावून खावी. तसेच दुधामधून नाचणीसत्त्वाची खीर बनवून खावी.

३) अति कष्टाची कामे असणाऱ्यांनी नाचणीची भाकरी आहारामध्ये आवर्जून खावी. यामधून अगदी कमी किमतीत शरीराचे पोषण करणारे सर्व घटक मिळतात. 'स्वस्थ आणि मस्त' या उक्तीप्रमाणे गरिबांचे धान्य म्हणून नाचणीचा उल्लेख केला जातो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



संतोष फुलचंद गांधी यांना जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करताना मान्यवर.

# संतोष गांधी यांना जैन ओसवाल समाज गौरव पुरस्कार प्रदान

नगर – सामाजिक, धार्मिक, अर्थकारण, राजकारण अशा विविध क्षेत्रात दोन दशकापासून अधिक काळापासून सातत्यपूर्ण योगदाने देणारे संतोष फुलचंद गांधी यांना जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अहिल्यानगर येथील जैन ओसवाल युवक संघाने (जॉईज) हा पुरस्कार दिला आहे.

जॉईज आयोजित कार्यक्रमात जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते संतोष गांधी यांना पत्नी वर्षा गांधी यांच्यासह हा पुरस्कार प्रदान करून सत्कार करण्यात आला. यावेळी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष सीए अशोक पितळे, राजेंद्र चोपडा, प्रधान मंत्री शैलेश मुनोत, जॉईजचे अध्यक्ष भूषण भंडारी आदी उपस्थित होते.

संतोष गांधी मागील २० वर्षापासून सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकारणात सक्रिय आहेत. आचार्यश्रींवर नितांत श्रध्दा असलेल्या गांधी यांनी मानव सेवेवर कायम भर दिला आहे. जैन ओसवाल पंचायत सभा, जैन वात्सल्य संस्था, सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक, सहकारी ग्राहक भांडार, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशा विविध संस्था, संघटनांवर ते कार्यरत आहेत. जैन ओसवाल पंचायत सभेच्या माध्यमातून समाजातील गरजूंना आवश्यक ती मदत करून त्यांना सन्मानाने उभे करण्यात ते अग्रेसर असतात. वात्सल्य संस्थेच्या माध्यमातूनही दर महिन्याला गरजू कुटुंबाना अन्नधान्य, किराणा दिला जातो. जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमनपद भूषविताना संस्थेने १०० कोटींच्या ठेवींचा पल्ला गाठला. संस्थेची जुनी वसूली प्रभावीपणे करून संस्थेच्या अर्थकारणाला बळकटी दिली तसेच विविध योजनांच्या माध्यमातून पतसंस्थेच्या व्यवसाय वृध्दीत योगदान दिले आहे. सभासदांना केंद्रस्थानी ठेवून उत्कृष्ट आर्थिक कामकाजाची परंपरा त्यांनी कायम राखली. संचालक म्हणूनही संस्थेच्या प्रगतीत ते सातत्याने योगदान देत आहेत. भाजपचे सक्रिय पदाधिकारी म्हणून ते शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील असतात. धार्मिक कार्यातही त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. साधूसाध्वीजींची सेवा करण्यात ते रममाण होतात. दिनदुबळ्यांची सेवा व गरजूंना मदत ही संतांची शिकवण ते कायम आचरणात आणतात. समाजासाठी चांगले काही तरी करण्याची आवड असल्याने स्वत:च्या कुरिअर व्यवसायाचा मोठा व्याप सांभाळून ते सामाजिक कार्यासाठी नियमित वेळ काढतात. त्यांच्या याच कार्यामुळे जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने त्यांचा उचित सन्मान झाला आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## त्यासाठी धैर्य लागते

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स




वेदकाळी लोक वरुणदेवाला खूपच भीत असत. वरुणदेव रागावू नये, ते सतत काळजी घेत. वसिष्ठ ऋषी एकदा चिंताक्रांत झाले. सतत दुःख, सतत मनाची अस्वस्थता त्यांना व्याकुळ करत होती. वरुणाचा काही तरी अपराध आपण केला आणि म्हणूनच वरुणदेव आपल्यावर रागावला आहे ही त्यांची धारणा झाली. त्यांचे अपराधी मन म्हणू लागले.

वरुणदेवा, हा माझा अपराध नाही. मला कुणी तरी उचकवल। मला माझी तशी दुर्बुद्धी. नशेत होतो मी धुंद ? की रागात? की अस्वस्थ होतो जुगारापायी म्हणून घडला हा अपराध ? बहुधा माझं मन विचलित झालेले असेल तेव्हा. आणि वरुणादेवा, लहानाकडून अपराध घडतात ना त्याला जबाबदार ही मोठी मंडळीच असतात बरं। मोठ्याचं पाहूनच छोट्यांना हिंमत होते ना? वरचेच भाग पाडतात कधी कधी खालच्यांना, अपराध करायला. बेसावध असतात लहान बिचारे. नाही येत भग्न त्यांना ते करताहेत त्याचं. झोपसुद्धा वाईटच. अनेक अपराधांचं मूळ म्हणजे झोपणं.

अगदी वेदकाळापासून दिसतं, की माणूस आपला अपराध कधी कबूल करीत नाही. नेहमी दुसऱ्यावर ढकलतो अपराधाराचे कारण आणि अगदी गयावया करीत, जीव तोडून देतो अनेक कारणे अपराधाची. पण कारणांमुळे काय अपराधाने परिमार्जन होते ?

आमचा मित्र हिवाळ्यात थंडी वाजते म्हणून उन्हे अंगावर घ्यायला बाहेर पडला. झाडाच्या सावलीत उभा राहिला. मग उन्हे लागणार कशी? थंडी जाणार कशी? पण थंडीने कुरकुडत म्हणतो कसा, पाहा ना, सुर्य कसा झाडाआड गेला. आपण झाडाखाली उभे राहायाचे आणि सुर्याला तो झाडाआड लपला म्हणून अपराधी म्हणायचे, माणसाची हीच रित वागण्याची.

अपराध घडला, एवढे तरी मानायचे, तेही श्रेष्ठाच्या धाकापायी, प्रवृत्ती वाममार्गाकडे वळण्याची.

संत नामदेव म्हणतात, ही तर श्वानाचीच प्रवृत्ती. श्वाने देखिला स्वयंपाक जोवरी जागे होते लोक । मग निजालिया नि:शक, मुळ चारी मडकी फोडिली ।। लोक जागे होते तोवर कुत्र्याला धाक होता. तो स्वयंपाकाकडे नुसता जिभल्या चाटीत पाहत होता पण लोक निजले आणि श्वान निर्भय झाले. अन्नावर तुटून पडले. भांडे फोडून सगळे अन्न संपवले. असेच माणसाचे धाक म्हणून मोठ्यापुढे धाक देखावा सगळा सज्ञनतेचा, भावभक्तीचा।

पण हा अडाणीपणा म्हणावा का? ज्ञानीही असेच, बुद्धिमान, पण इमान हरवून बसलेले तेव्हा प्रत्यक्ष अपराध करायला नाही, पण केलेला अपराध कबुल करायला धैर्य लागते. असा धैर्यवानच समाजाने भले करु शकतो. अशा माणसाचीच गरज व पारख मात्र हवी.

**– किशोर गांधी**

# गोगादेव जन्मोत्सवानिमित्त श्रीराम चौक ते साई मंदिर मिरवणूक



नगर – अहिल्यानगर या ऐतिहासिक शहरातील जय वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त १३ मानाच्या नाथांचे आगमन होणार असून २७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड, एकविरा चौक, श्रीराम चौक ते द्वारकामाई साई मंदिरात मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी दिली.

दरवर्षीप्रमाणे जय वीर गोगादेव जन्मोत्सव निमित्त १३ मानाचे गुरु गोरक्षनाथ निशान आखाडा, नालेगाव निशान आखाडा, भाई भाई निशान आखाडा, बातरी बेडा निशान आखाडा, गोपाल भगत निशान आखाडा, डीपू के राजा, रत्न वस्ताद, बिग्रेड जमदार, ग्यारह भाई,माळीवाडा, मंगल गेट, सिद्धार्थनगर निशान मेल सहभागी होणार आहे.

द्वारकामाई साई मंदिरात मिरवणुकीची सांगता महाआरती, भजन व महाप्रसादाने होईल. यावेळी आ. संग्राम जगताप, आ. अक्षय कर्डिले, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, संध्याताई पवार, नगरसेवक निखिल वारे, महेश तवले तसेच अशोक पालवे महाराज उपस्थित राहणार आहेत. मान्यवरांच्या हस्ते महाआरती होऊन भजनाचा कार्यक्रम होणार आहे. महाप्रसादाची मंदिराच्या वतीने व्यवस्था करण्यात आली असून या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ, नाथांच्या काठीच्या दर्शनाचा लाभ भाविकांनी घ्यावा. तसेच दरवर्षीप्रमाणे मिनी बागड होणार आहे. सर्वांनी सावेडीची मिनी बागडमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन आकाश त्र्यंबके, योगेश पिंपळे यांनी केले आहे.

# जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानच्या दंतरोग शिबिरात २७५ विद्यार्थ्यांची तपासणी


कनोरे प्रशालेत विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली.

नगर – भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान व गोरे डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण रोड येथील संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी दंत व मौखिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या प्रारंभी डॉ. अंजली गोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना दंत व मौखिक आरोग्याबाबत येणाऱ्या समस्यांविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर डॉ. अंजली गोरे व त्यांच्या टीमने जवळपास २७५ विद्यार्थ्यांची दंत व मौखिक आरोग्य तपासणी केली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना भामरे, जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण डफळ, विश्वस्त अभिजित अष्टेकर, किशोर विंचुरकर, प्रशांत भंडारे, प्रसाद कांबळे, योगेश पांढरपोटे, ओंकार दळवी, सहशिक्षक सुशीलकुमार आंधळे, बबन शेख, राजेंद्र गर्जे, चंदा कार्ले, वैशाली केदारे, सुरेखा कर्डिले, राणी पवार, विद्या नरसाळे, अनिता जपकर आदी उपस्थित होते.

बालवयापासूनच विद्यार्थ्यांवर स्वच्छतेचे संस्कार होणे आवश्यक आहे. दररोज दोन वेळा दात स्वच्छ करणे आणि दातांची निगा राखणे महत्त्वाचे आहे. चॉकलेट, कॅडबरी व गोड पदार्थांसारख्या गोष्टींमुळे दात किडण्याची शक्यता असते. दंत हे मानवी शरीरातील अविभाज्य भाग असून ते निरोगी राखण्यासाठी सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. शालेय जीवनापासूनच दातांची निगा राखणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन दंतरोगतज्ज्ञ डॉ. अंजली गोरे यांनी केले.

प्रास्ताविक किरण डफळ यांनी केले. सूत्रसंचालन राजेंद्र गर्जे यांनी केले. आभार सुशीलकुमार आंधळे यांनी मानले.

# शब्द नव्हे, संकेत बोलले

## जानकीबाई आपटे विद्यालयात सायबर सुरक्षेची अभिनव जनजागृती



जानकीबाई आपटे विद्यालयात सायबर सुरक्षेची अभिनव जनजागृती करण्यात आली.

नगर – सायबर सुरक्षेचा संदेश देण्यासाठी नेहमी शब्दांची गरज असतेच असे नाही; कधी एखादे चिन्ह, एखादा इशारा किंवा एखादे चित्रही मोठा संदेश देऊन जाते. याच विचारातून जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृतीचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. क्लिक हिल फॉउंडेशन यांच्या सायबर शिक्षा, सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमात अहमदनगर कॉलेज मधील विद्यार्थिनी श्रेया गुरूंग आणि पूजा पवार यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या संवादाची गरज लक्षात घेऊन सायबर सुरक्षेची माहिती पारंपरिक पद्धतीने न देता दृश्य माध्यमे, विविध संकेत, चित्रे, माहितीपर चार्ट आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेले विशेष बोर्ड यांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आली. विविध सायबर धोके, ऑनलाइन फसवणूक, संशयास्पद लिंक व संदेश, सुरक्षित पासवर्ड, सोशल मीडिया सुरक्षितता आणि वैयक्तिक माहितीची गोपनीयता याबाबत सोप्या व प्रभावी पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात 'धोका ओळखा' या स्वरूपातील दृश्य उदाहरणांचाही वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांसमोर विविध ऑनलाइन संदेश, चिन्हे आणि परिस्थिती मांडून त्यातील सुरक्षित व धोकादायक बाबी ओळखण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ माहिती घेण्याऐवजी पाहून, ओळखून आणि कृतीतून सायबर सुरक्षा समजून घेण्याची संधी मिळाली. या उपक्रमावेळी श्री. सतीश दगडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले तसेच आपल्या अनुभवातून डिजिटल जगात सुरक्षित आणि जबाबदारपणे वावरण्याचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या विषयाची व्यावहारिक बाजू समजून घेण्यास मदत झाली.

पाहा समजा सावध रहा सुरक्षित रहा हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. संवादाच्या पारंपरिक मर्यादा लक्षात घेऊन सायबर सुरक्षेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न विशेष ठरला. कार्यक्रमावेळी विद्यालयाचे प्राचार्य विजय आरोटे उपस्थित होते. त्यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षित आणि जबाबदारपणे वावरण्याचे आवाहन केले. सायबर सुरक्षेचा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने शब्दांपेक्षा संकेतांची भाषा वापरून केलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरला.

# एकाच ठिकाणी २ लाख ७५ हजार ११५ भाविकांचा 'व्यसनमुक्त भारत' करण्यासाठी शपथ घेण्याचा विक्रम


एकाच ठिकाणी २ लाख ७५ हजार ११५ भाविकांचा 'व्यसनमुक्त भारत' करण्यासाठी शपथ घेण्याचा विक्रम झाल्यानंतर विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र सरला बेट चे मठाधिपती गुरुवर्य महंत रामगिरी महाराज यांना प्रदान करताना डॉ दीपक हरके.

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र धनगरवाडी येथे २३ ऑगस्ट रोजी, संत योगीराज सद्गुरू श्री गंगागिरी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहादरम्यान, 'सरला बेट'चे विद्यमान प्रमुख श्री रामगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली 'व्यसनमुक्त भारत' करण्यासाठी एकाच ठिकाणी २ लाख ७५ हजार ११५ लोकांनी एकाच वेळी शपथ घेण्याचा विक्रम नोंदवला गेला. त्याची 'विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद करण्यात आली आहे.

विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र अध्यक्ष डॉ दीपक हरके यांनी सरला बेट चे मठाधिपती गुरुवर्य महंत रामगिरी महाराज यांना प्रदान केले. यावेळी मधु महाराज, ब्रह्माकुमारीज संस्थेच्या राजयोग एज्युकेशन अँड रिसर्च फाऊंडेशनच्या मेडिकल विंग चे कार्यकारी सचिव आणि १० कोटी नशा मुक्ती प्रतिज्ञा महाअभियानाचे प्रमुख बी. के. डॉ. बनारसी लाल भाईजी, अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या संचालीका बी के राजेश्वरी दीदी, अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या उपसंचालीका बी के सुप्रभा दीदी, सोनई सेवाकेंद्राच्या संचालीका बी के उषा दीदी, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील उपस्थित होते.

याआधी चा विक्रम आर्ट ऑफ लिव्हिंग चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या उपस्थितीत ४ फेब्रुवारी २०२३ रोजी कोथरूड (पुणे) येथील सूर्यकांत काकडे फार्म्स येथे एकाच ठिकाणी 'व्यसनमुक्त भारत' करण्यासाठी सर्वाधिक लोकांचा एकत्रित शपथविधी द आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशन ने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या कार्यक्रमात १ लाख २६ हजार ६१३ लोकांनी एकाच ठिकाणी 'व्यसनमुक्त भारत' करण्यासाठी एकत्रित शपथ घेऊन विक्रम प्रस्थापित केला होता.


खेडकर यांना नियुक्तीचे पत्र देताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील.

# भारतीय जनता पार्टीच्या निवृत्त अधिकारी प्रकोष्ठच्या शहराध्यक्षपदी हरीश खेडकर

नगर – सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर यांची भारतीय जनता पार्टी निवृत्त अधिकारी प्रकोष्ठच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीचे पत्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते खेडकर यांना प्रदान करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाबासाहेब सानप, अशोक गायकवाड आदी उपस्थित होते.

# प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारणार

## विजय गोरे यांची घोषणा


केडगाव येथे वीर वडार एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय गोरे यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

## महाराष्ट्र जनसंपर्क दौरा व संघटनात्मक अभियानास प्रारंभ

नगर – वडार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि मूलभूत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी वीर वडार एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्याच्या जनसंपर्क दौरा व संघटनात्मक अभियानाचा शुभारंभ केडगाव येथील अर्चना हॉटेलमध्ये करण्यात आला. समाजाच्या विविध प्रश्नांवर राज्य सरकारकडे आवाज उठविण्यासोबतच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारून त्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास रविंद्र शिंदे, राजेंद्र नन्नवरे, माजी नगरसेवक नितीन शेलार, रमेश जेठे, बिंदू लष्करे, सचिन शिंदे, टी. एस. चव्हाण, ब्रह्मा धोत्रे, रमेश धोत्रे, नागेश चौगुले, सचिन कुसळकर, संदीप कुसळकर, अनिल मोठे, किरण तागडकर, गोरख म्हस्के, मोहन पवार, कैलास विटेकर, पप्पू कुसाळकर, राधेश्याम कुसमुडे, किरण कुसमुडे, राजेंद्र नन्नवरे, रामचंद्र मंजुळे, नवनाथ जाधव, मच्छिंद्र येवले, विठ्ठल लष्करे आदी उपस्थित होते.

फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय गोरे म्हणाले, राजकीय पक्षांतील नेते आणि विविध संघटनांनी वडार समाजाला कुठे नेऊन ठेवले आहे, असा प्रश्न आजही उपस्थित होतो. समाज मूलभूत प्रश्नांपासून दूर आहे. त्यामुळे समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारकडे ठामपणे आवाज उठविण्यात येणार आहे. समाजाचे प्रश्न ऐकून घेण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारण्यात येईल आणि त्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम केले जाईल. समाजातील गोरगरीब कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी दिवाळीच्या सणादरम्यान राज्यस्तरीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचेही गोरे यांनी सांगितले. वडार समाजावर होणारा अन्याय आणि अत्याचार यापुढे खपवून घेतला जाणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगड किल्ला हिरोजी इटळकर यांनी उभा केला असून, वडारी भाषेत दगडाला राय म्हणतात. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्याला रायगड हे नाव दिले, असा इतिहास लपविण्यात आला असल्याची भूमिका विजय गोरे यांनी व्यक्त केली.

हिरोजी इटळकर यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले असून, त्यांची जन्मतारीख शोधून राज्यभर मोठ्या प्रमाणात जयंती साजरी करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

माजी नगरसेवक नितीन शेलार म्हणाले की, वडार समाज हा कष्टकरी समाज म्हणून ओळखला जातो. मात्र समाजाचे विविध प्रश्न आजही प्रलंबित आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी समाजाने एकत्र येणे गरजेचे आहे. विजय गोरे यांच्या माध्यमातून राज्यातील वडार समाजाला एकत्रित करण्याचे काम केले जाईल.

यावेळी विविध मान्यवरांची भाषणे झाली. वीर वडार एकता फाउंडेशनच्या वतीने वडार समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन राज्य शासनाकडे देण्यात येणार आहे. समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असून, समाजाच्या विविध प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

# ‘आनंदऋषी’ मध्ये इंडो युरॉलॉजिकल व स्टोन शस्त्रक्रिया शिबिर

## ९० रुग्णांना तज्ज्ञांकडून तपासणी व उपचार



श्री आनंदऋषी हॉस्पिटल येथे मोफत इंडो युरॉलॉजिकल व स्टोन शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन करताना मानकचंद कटारिया समवेत डॉ. मितेश कटारिया, डॉ. निखिता कटारिया, डॉ. अजित दरंदले, डॉ. अमेय सांगळे, डॉ. संकेत काळपांडे, डॉ. वसंत कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, सतीश लोढा आदी.

नगर – श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य विविध मोफत रोग तपासणी शिबिरामध्ये इंडो युरॉलॉजिकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) तसेच स्टोन शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन आयोजक मानकचंद संज्ञनबाई कटारिया यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी मानकचंद कटारिया, रेडिओलॉजिस्ट डॉ. मितेश कटारिया, डॉ. निखिता कटारिया, डॉ. अजित दरंदले, डॉ. अमेय सांगळे, डॉ. संकेत काळपांडे, डॉ. वसंत कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, सतीश लोढा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयोजक मानकचंद कटारिया म्हणाले की, आरोग्य ही प्रत्येकाची मूलभूत गरज असून आर्थिक अडचणींमुळे कोणालाही उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा आनंदऋषी हॉस्पिटलच्या सेवाकार्याचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हावी, यासाठी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने विविध आरोग्य उपक्रम राबविले जात आहेत. एखाद्या रुग्णाला वेळेवर योग्य निदान आणि उपचार मिळाल्याने त्याचे जीवन अधिक सुखकर होऊ शकते. गेल्या ३० वर्षांपासून आनंदऋषी हॉस्पिटल ची सेवा करताना मला मनस्वी आनंद होत आहे.त्यामुळे आरोग्यसेवेचे हे कार्य केवळ वैद्यकीय सेवा नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. निखिता कटारिया म्हणाल्या की, आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून विविध माध्यम ातून रुग्णसेवा केली जात आहे. आर्थिक परिस्थिती उपचारांच्या आड येऊ नये, यासाठी परवडणाऱ्या दरात तसेच गरजेनुसार मोफत उपचार देण्याचा आमचा प्रयत्न असतो. आमच्या सासऱ्यांनी गेल्या तीस वर्षांपासून सेवाभावी वृत्तीने रुग्णसेवेचे कार्य केले आहे. त्यांच्याकडून मिळालेली ही सेवाभावाची प्रेरणा आम्ही दांपत्य पुढे नेत आहोत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असून, भविष्यातही हे सेवाकार्य सातत्याने सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अजित दरंदले यांनी सांगितले की, मूत्रपिंडातील खडे आणि मूत्रमार्गाशी संबंधित आजारांकडे सुरुवातीच्या टप्प्यातच लक्ष देणे आवश्यक आहे. बदलती जीवनशैली, कमी पाणी पिण्याची सवय, अयोग्य आहार आणि उन्हात जास्त वेळ राहणे यामुळे स्टोनच्या समस्येचे प्रमाण वाढताना दिसते. शरीराला आवश्यक तेवढे पाणी मिळणे हा या आजारांपासून बचावाचा महत्त्वाचा भाग आहे. लघवी करताना जळजळ किंवा त्रास होणे, पाठ अथवा पोट दुखणे, लघवीमध्ये बदल जाणवणे यांसारखी लक्षणे दिसल्यास ती अंगावर न काढता तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे अनेक शस्त्रक्रिया कमी त्रासदायक आणि अधिक सुरक्षित पद्धतीने करता येतात. त्यामुळे योग्य वेळी निदान व उपचार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक डॉ. वसंत कटारिया यांनी यांनी केले. यावेळी त्यांनी मानकचंद कटारिया परिवार यांचे विशेष आभार मानत, सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणाऱ्या या परिवाराचे आनंदऋषी हॉस्पिटलला वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले आहे. समाजातील गरजू घटकांसाठी आरोग्यसेवेचे उपक्रम राबविताना अशा सेवाभावी परिवारांचे सहकार्य निश्चितच प्रेरणादायी ठरते, असे गौरवोद्गार काढले. आभार सतीश लोढा यांनी मानले. या शिबिरामध्ये एकूण ९० रुग्णांनी तपासणी व उपचाराचा लाभ घेतला. रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले.



स्वास्थ्यदर्पण संस्थेच्या माध्यमातून संचलित शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे बुद्रूक यांना सीएसआरडी संस्थेच्या वतीने सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# स्वास्थ्यदर्पण व शांतिनिकेतन संस्थेचा पुरस्काराने गौरव

नगर – स्वास्थ्यदर्पण संस्थेच्या माध्यमातून संचलित शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे बुद्रूक यांना सीएसआरडी संस्थेच्या वतीने सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे संचालक डॉ. प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रमांची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

सावेडीतील माऊली सभागृह येथे हा सन्मान सोहळा पार पडला. कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, दिवाणी न्यायाधीश सचिन आर. शिंदे, आयजेएम–सिनिअर असोसिएट गोरख जाधव, सीएसआरडीचे डायरेक्टर सुरेश पठारे यांची प्रमुख उपस्थिती होती. एनएपीएसडब्ल्युआयचे अध्यक्ष डॉ. संजय भट हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

सामाजिक कार्याची २६ वर्षांची परंपरा आणि शैक्षणिक क्षेत्रातील १० वर्षांची यशस्वी वाटचाल–या दोन्हींचा गौरव करणारा हा पुरस्कार शांतिनिकेतन परिवारासाठी निश्चितच अभिमानाचा क्षण ठरला आहे, असे संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत शिंदे यांनी सांगितले.

स्वास्थ्यदर्पण संस्थेने मागील २६ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात विविध माध्यमांतून उल्लेखनीय योगदान दिले आहे. संस्थेने एचआयव्ही बाधित म हिला व मुलांसाठी १९९९ मध्ये मानव्य आश्रमाची स्थापना केली. तसेच महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडींसाठी आरोग्य पुस्तिकांचे वितरण, मागास जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम, माहिती अधिकार जनजागृती अभियान, कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण पुस्तिका निर्मिती, जलसंधारण व ग्रामीण विकासाशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभाग अशी विविध कामे केली आहेत. याशिवाय निर्मल भारत अभियानांतर्गत ओडीएफ ग्रामपंचायत तपासणी, विद्यार्थ्यांसाठी बालचित्रपट म होत्सवाचे आयोजन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका निर्मिती, सामाजिक न्याय विभागाच्या सहकार्याने जागर समतेचा अभियान तसेच लोकशाही उत्सव आणि युवकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत.

सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण आणि समाजसेवा यांचा समन्वय हीच स्वास्थ्यदर्पण संस्थेची ओळख असून, मिळालेला हा सन्मान पुढील कार्यासाठी नवी प्रेरणा देणारा आहे, अशी भावना संस्थेच्या सचिव प्रा. सोनाली शिंदे यांनी व्यक्त केली.



बहुजन साहित्य संमेलनात फुले – शाहू – आंबेडकर पुरस्काराने साहित्यिका रचना यांचा गौरव करण्यात आला.

# लेखिका रचना यांचा फुले-शाहू-आंबेडकर पुरस्काराने गौरव

नगर – साहित्यातून परिवर्तनवादी विचार पेरणाऱ्या येथील साहित्यिका रचना यांना ७ व्या बहुजन साहित्य संमेलनात २३ ऑगस्ट रोजी फुले – शाहू – आंबेडकर पुरस्काराने गौरविण्यात आले. यापूर्वी रचना यांना त्यांच्या साहित्यिक योगदानासाठी महाराष्ट्र शासनाच्या श्री. ना. पेंडसे पुरस्कारासोबत इतर महत्वाच्या २२ पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.

बहुजन साहित्य संघांच्यावतीने पंढरपूर येथे आयोजित ७ व्या राज्यस्तरीय बहुजन साहित्य संमेलनात रचना यांचा गौरव करण्यात आला. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व कवी नागेश सिंघण होते. माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. स्वागताध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक आशा खडतरे –डांगे यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाला डॉ. गणेश गायकवाड, डॉ. मिलिंद दहिवले, आ. प्रशांत परिचारक, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक, नेताजी विद्याविकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. ए. गायकवाड, चिखली नगरपालिकेचे नगराध्यक्ष पंडितराव देशमुख, पंढरपूर अर्बन बँकेचे संचालक गणेश सिंघण आदी उपस्थित होते.

संमेलनाच्या आयोजनात निमंत्रक डॉ. डी. व्ही. खरात, अध्यक्ष रवि पुष्पा वसंत सोनार, सहसचिव ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे, उपाध्यक्ष सुधाकर जाधव, डॉ. बबनराव महामुने, प्रा. शालिनी काटोले, रमेश खंडारे व ज्ञानेश्वर बुधवत यांनी योगदान दिले. संमेलनातील विविध सत्रांमध्ये साहित्य, सामाजिक प्रबोधन व बहुजन विचारांवर चर्चा करण्यात आली.

# पतसंस्थांचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा



पतसंस्थांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटनप्रसंगी आ. मोनिकताई राजळे, काकासाहेब कोयटे, वसंत लोढा, किशोर गांधी आदी.

नगर – पाथर्डी तालुक्यातील मोहटादेवी देवस्थानच्या भक्त निवासात पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील पतसंस्थांच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण राबविण्यात आले. सहकारी बँकिंगमधील अनुभवी अधिकारी किशोर गांधी यांनी पतसंस्थेचे संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांच्या भागिदारी विषयी मार्गदर्शन केले.

नाशिक विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांच्या पुढाकाराने व प्रयत्नाने अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध तालुक्यात प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. पारनेर, कर्जत, जामखेड, संगमनेर येथील प्रशिक्षण शिबिरे उत्साहात पार पडली.

शेवगाव व पाथर्डी तालुक्यांच्या शिबिरात बोलताना गांधी म्हणाले, पतसंस्था किंवा कोणत्याही सहकारी आर्थिक संस्थेत कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची व आवश्यक असते. त्यांना योग्य प्रशिक्षण मिळाल्याने त्यांची कार्यक्षमता वाढते तसेच त्यांची व पतसंस्थेची व्यावसायिकता वाढते. पतसंस्था एक कुटुंब आहे. त्यात संचालक मंडळ वडीलधारी पालक आहेत. कर्मचारीरूपी पाल्यांनी पतसंस्थेच्या प्रगतीत , व्यवसाय वृद्धीसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण संस्थेच्या सक्षम आर्थिक स्थितीवरच त्यांचेही भवितव्य अवलंबून असते.

पतसंस्था चळवळीचे नेते वसंत लोढा यांनी पतसंस्था चालवताना येणाऱ्या अडचणी व अनुभवांचा उहापोह करताना ही चळवळ फेडरेशनच्या माध्यमातून अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. पतसंस्था चळवळीतील ज्येष्ठ महर्षी काकासाहेब कोयटे यांनी अनुभव संपन्न विचार मांडताना आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध तरतुदी, भविष्यातील योजनांचा सविस्तर आढावा घेतला.

आ. मोनिकाताई राजळे यांनी जिल्हा बँकेच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा सहकारी बँक व शासनाद्वारे प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. अर्थतज्ज्ञ प्रशांत भालेराव यांनी कर्मचाऱ्यांच्या कौशल्यावर त्यांना प्रशिक्षण व प्रमोशन दिले जात असल्याचे सांगितले.

या प्रशिक्षण शिबिरात पाथर्डी, शेवगाव तालुक्यातील बहुतांश पतसंस्थेचे संचालक, व्यवस्थापक, कर्मचारी सहभागी झाले होते. शिबिराच्या यशस्वितेसाठी स्थैर्य निधी संचालक उमेश मोरगावकर यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांना सचिव महेश जाधव यांचे सहकार्य लाभले.

# मोफत मेकअप प्रशिक्षण कार्यशाळेस महिलांचा प्रतिसाद

नगर – भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवा निमित्त स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ आणि भगवान जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट यांच्या संयुक्त विद्यमाने बागडपट्टी येथील जिव्हेश्वर भवन येथे सर्वांसाठी मोफत मेकअप प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

युवा मेकअप आर्टिस्ट नक्षत्रा कांबळे यांनी प्रशिक्षण दिले. त्यांनी प्रोफेशनल मेकअप स्वतः कसा करावा, स्किन आणि पर्सनॅलिटीनुसार मेकअप, ड्रेपिंग, हेअर केअर तसेच काही खास मेकअप मॅजिक टिप्स याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, उत्सव समिती प्रमुख नीरज चांगटे, योगेश भागवत, महेश कांबळे, छाया विलास साळी, वनिता पाटेकर, सुरेखा शेकटकर, शुभदा वल्ली, अनुजा कांबळे, अनुराधा मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## निमगाव वाघा येथे विविध क्रीडा स्पर्धा संपन्न

नगर – नवनाथ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे विविध उपक्रम उत्साहात पार पडले. यामध्ये विविध वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला. स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्यरूपी बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, आप्पासाहेब कदम, शरद भोस, तेजस केदारी, प्रमोद थिटे, तुकाराम पवार, मंदा साळवे, स्वाती इथापे, मोहिनी धर्माधिकारी, रेखा जरे, पल्लवी खरात, सुप्रिया ठुबे, दिपाली म्हस्के, रत्नमाला थोरात, मयुरी जाधव, निकिता रासकर, प्रशांत जाधव, लहानू जाधव आदी उपस्थित होते.




विजेत्यांना चषक व मेडल प्रदान करताना नरेंद्र फिरोदिया, मनोज वाळवेकर, खालिद सय्यद, रौनप फर्नांडिस, रिशपालसिंग परमार, तपन परमार आदी.

# फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत सेंट मायकल्स, प्रवरा स्कूल, सेक्रेड हार्टला विजेतेपद

नगर – अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यां मध्ये विजेतेपदासाठी संघांनी अक्षरशः जीवाचे रान केले. काही सामन्यांचा निकाल शेवटच्या क्षणापर्यंत लांबला, तर दोन अंतिम सामने टायब्रेकरपर्यंत रंगले. अखेर १६ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल, १२ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल्स स्कूल, १४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल आणि १६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूलने विजेतेपद पटकावले.

स्पर्धेतील विजयी, उपविजयी व तृतीय क्रमांक मिळवलेल्या संघांना फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनचे मुख्य विश्वस्त तथा अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि शिवाजियन्स स्पोर्ट्‌स क्लबचे अध्यक्ष तथा फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या हस्ते चषक देण्यात आले. यावेळी फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, सचिव रौनप फर्नांडिस, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहाय्यक खजिनदार तपन परम ार, फिरोदिया शिवाजियन्स अॅक्ढमी मुख्य आयोजन समितीच्या सदस्य पल्लवी सैंदाणे, राजेश अँथनी, जेव्हिअर स्वामी, सचिन पाथरे, अभय साळवे, अभिषेक सोनवणे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून अभय साळवे, विल्यम राज, अभिषेक सोनवणे, साहिल कुसळकर, सोनिया दोसानी, जोएल पाथरे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रणाली क्षीरसागर यांनी केले. स्पर्धेचे समालोचन राहुल क्षीरसागर यांनी केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी फिरोदिया शिवाजियन्सच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल विरुद्ध प्रवरा पब्लिक स्कूल यांच्यात अंतिम सामना रंगला. प्रवरा पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी बचावात्मक खेळ करत आर्मी पब्लिक स्कूलला एकही गोल करू दिला नाही. अखेर २–० गोलने प्रवरा पब्लिक स्कूलच्या मुलींच्या संघाने विजेतेपद मिळवले. या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचा संघ तृतीय क्रमांकावर राहिला.

१२ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील स्कूल विरुद्ध सेंट मायकल्स स्कूल यांच्यात अंतिम सामना झाला. या सामन्यात २–० गोलने सेंट मायकल्स स्कूलने विजय मिळवला. या गटात आयकॉन पब्लिक स्कूलचा संघ तृतीय क्रमांकावर राहिला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल विरुद्ध सेंट मायकल्स स्कूल असा अंतिम सामना रंगतदार झाला. सेंट मायकल्सकडून अनिस झांजे याने ३५व्या मिनिटाला गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर प्रवरा स्कूलकडून ३९व्या मिनिटाला मोहित चौधरी याने गोल करून बरोबरी साधली. सामन्याच्या शेवटपर्यंत दोन्ही संघ १–१ गोलने बरोबरीत राहिल्याने सामना टायब्रेकरवर घेण्यात आला. टायब्रेकरमध्ये ३–२ गोलने प्रवरा पब्लिक स्कूलने विजय मिळवत विजेतेपद पटकावले. या गटात आर्मी पब्लिक स्कूलचा संघ तृतीय क्रमांकावर राहिला.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल विरुद्ध आर्मी पब्लिक स्कूल असा अत्यंत अटीतटीचा सामना प्रेक्षकांना अनुभवता आला. आर्मी स्कूलकडून आदर्श द्विवेदी याने ३०व्या मिनिटाला गोल करून आघाडी घेतली. मात्र सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात सेक्रेड हार्टकडून जोएल साठे याने गोल करून बरोबरी साधली. शेवटपर्यंत १–१ गोलची बरोबरी राहिल्याने हा सामना टायब्रेकरवर घेण्यात आला. टायब्रेकरवरसुद्धा ३–३ गोलने बरोबरी साधली गेली. त्यानंतर सडन डेथवर सामना घेण्यात आला. पुन्हा तीनदा संधी बरोबरीत गेल्यानंतर अखेर ३–२ गोलने सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलने दणदणीत विजय मिळवला. मागील वर्षी आर्मी पब्लिक स्कूलला अंतिम सामन्यात पराभव स्वीकारावा लागला होता. यावर्षी देखील हीच पुनरावृत्ती झाली. थोडक्यात त्यांचे विजेतेपद हुकले. या गटात आठरे पाटील स्कूलचा संघ तृतीय क्रमांकावर राहिला.

१२ वर्षांखालील गटात नाविल दिवानी (सेंट मायकेल्स स्कूल), प्रिन्स चंदन (प्रवरा पब्लिक स्कूल), सैराज तागड (आठरे पाटील स्कूल), अरव बजाज (आयकॉन पब्लिक स्कूल), कृषिव केशी (आठरे पाटील स्कूल), १४ वर्षांखालील गटात शौर्य चंगेडिया (सेंट म ायकल स्कूल), अजय सांगळे (आर्मी पब्लिक स्कूल), रुद्र भोये (प्रवरा पब्लिक स्कूल), आदर्श साबळे (आर्मी पब्लिक स्कूल), १६ वर्षांखालील गटात लक्ष्य चौहान (गोलरक्षक, आर्मी पब्लिक स्कूल), अंशुमान विधाते (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट), रामचंद्र पालवे (प्रवरा पब्लिक स्कूल), ओम लोखंडे (आठरे पाटील स्कूल), अशोक चांद (आठरे पाटील स्कूल), अफान शेख गोलरक्षक (सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट), १६ वर्षांखालील मुलींचा गटात हृदया तडके (श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल), प्रांजल काकडे (आर्मी पब्लिक स्कूल), हेमा गावित (प्रवरा पब्लिक स्कूल), काव्या झावरे (पोदार स्कूल) यांचा उत्कृष्ट खेळाबद्दल वैयक्तिक पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.




रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत आ. संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, महिला बालकल्याण सभापती दिपाली बारस्कर आदी.

# मोबाईल रिटेल्स असोसिएशन, काका ट्रस्ट आयोजित शिबिरात पाच हजाराहून अधिक दात्यांचे रक्तदान

नगर – अहिल्यानगर मोबाईल रिटेल असोसिएशन, काका ट्रस्ट, आय लव्ह नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महारक्तदान शिबिरात महायुतीचे नगरसेवक, विविध क्षेत्रातील नागरिक, असंख्य रक्तदाते यांनी सहभागी होत शहरातील सर्व रक्त पेढ्यांच्या स्टॉलवर रक्तदात्यांनी रांगा लावल्या होत्या. सकाळी साडेसहा वाजता सुरू झालेले हे रक्तदान शिबीर रात्री नऊ वाजेपर्यंत सुरू होते. या शिबिरात ५ हजारपेक्षा अधिक दात्यांनी रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास स्वागताध्यक्ष आ. संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, महिला बालकल्याण सभापती दिपाली बारस्कर, माजी उपमहापौर गीतांजली काळे, गणेश भोसले, मोबाईल कंपन्यांचे वितरक कमलेश भिंगारवाला, हितेश सोनीमंडेलेचा, अमित सिंग, उपेंद्र रासने, नोडल ऑफिसर सुजाता बांगरे, आहिल्यानगर मोबाईल रिटेल असोसिएशनचे राज्याचे अध्यक्ष अजित जगताप, जिल्हाध्यक्ष अजित पवार, उपाध्यक्ष गोरख पडोळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना विखे पाटील म्हणाले, रक्तदानाविषयी समज–गैरसमज दूर करत जनजागृती करून मोठ्या प्रमाणात रक्त संकलन करत असल्याने ते कौतुकास पात्र आहेत. ज्या पद्धतीने नेटवर्कद्वारे मोबाईल जोडले जातात त्याचप्रमाणे मोबाईल असोसिएशनने रक्तदान शिबिराच्या माध्यमातून माणुसकीचे नाते जोडले आहे. या रक्तदान शिबिरात महिलांचा झालेला उत्स्फूर्त सहभाग हा राज्यातील सर्वात मोठा सहभाग असावा.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, प्रत्येक नागरिकांनी आपला वाढदिवस जर रक्तदान करून किंवा रक्तदान शिबिराचे आयोजन करून साजरा केल्यास करोडो नागरिकांचे रक्तदान शक्य आहे. तरच देशातील रक्ताचा तुटवडा कमी होईल व आपण परदेशातही रक्त पुरवू शकू. मोबाईल रीटेल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी रक्तदान संकलनासाठी घेतलेला पुढाकार प्रेरणादायी आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक प्रमुख मुम्मका सूदर्शन यांनी रक्तदान शिबिराला सदिच्छा भेट देऊन मार्गदर्शन केले. रक्तदान शिबिराविषयी माहिती देताना अजित जगताप म्हणाले, २०१६ ला मोबाईल रिटेल असोसिएशनची स्थापना होऊन मोबाईल वितरकांचे प्रश्न सोडवण्यास काम सुरू केले. या कामातूनच पुढे सामाजिक उपक्रमांची प्रेरणा मिळून २०२१ पासून रक्तदान शिबिराचे आयोजन सुरू केले. ही रक्तदान चळवळ अशीच अखंडितपणे पुढे चालू राहून रक्त संकलन व जनजागृती तसेच नवे रक्ताचे निर्माण करणे हा उद्देश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोरख पडोळे यांनी केले. या कार्यक्रमास स्नेहल भोसले, योगेश झंवर, नगरसेवक विकी जगताप, अविनाश घुले, महेश तवले, सुरेश बनसोडे, सुजाता पडोळे, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, भगवान फुलसौदर, अनिल बोरुडे, दत्ता गाडीळकर, उद्योजक आशिष पोखरणा, कुमार वाकळे, सुनील त्रिंबके, प्रा. माणिक विधाते, मीना चोपडा, मयूर बांगरे, सुनीता फुलसुंदर, वर्षा काकडे, सोनाबाई शिंदे, मयुरी जाधव, अनिता शेटिया, अजिंक्य बोरकर, सागर बोरुडे, विपुल शेटीया, आंबेजोगाई येथील उद्योजक राज देशमुख आदी उपस्थित होते. शिबिराचे नियोजन अमित बुरा, संतोष बालदोटा, रितेश सोनीमंडलेचा, मनीष चोपडा, अतुल रच्चा, मनोज बारलोटा, हिरा खुबचंदानी, राकेश सोनीमंडलेचा, प्रीतम तोडकर व साजिद खान आदींसह पदाधिकाऱ्यांनी केले.

# अर्थजगत

**भारतात मध्यमवर्गासाठी मालमत्तेतील गुंतवणूक ही सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक सुरक्षेची मुख्य पावती मानली जाते. लोकांकडे थोडेफार पैसे जमा झाले की ते सर्वात आधी जमीन, फ्लॅट किंवा दुकान खरेदी करण्याचा विचार करतात. परंतु, मागील काही वर्षांत रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट आणि इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट या नवीन पर्यायांकडे गुंतवणूकदारांचा ओढा जलद गतीने वाढला आहे. अशा परिस्थितीत, स्वतःची जमापुंजी थेट जमीन किंवा फ्लॅट खरेदी करण्यासाठी वापरणे अधिक फायदेशीर आहे की या ट्रस्टच्या माध्यमातून अप्रत्यक्ष गुंतवणूक करणे अधिक समजूतदारपणाचे ठरेल, हा प्रश्न सध्या गुंतवणूकदारांसमोर उभा राहिला आहे. याची मिमांसा करणारा खास लेख...**

## मालमत्तेत गुंतवणूक करताना कोणता पर्याय फायदेशीर?

■ जाणून घ्या



थेट मालमत्ता खरेदीचा विचार केल्यास बँक खात्यात मोठी रक्कम असणे अपरिहार्य आहे. कोणतीही स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी किमान २५ ते ३० लाख रुपयांची गुंतवणूक करावी लागते. यासाठीचा प्रमुख पर्याय म्हणजे दीर्घ मुदतीचे गृहकर्ज घेणे. पण त्याचे हप्ते १५-२० वर्षे फेडावे लागतात.

■ या पार्श्वभूमीवर एखाद्या किरकोळ गुंतवणूकदाराकडे मर्यादित निधी असेल, तर त्याच्यासाठी हे ट्रस्ट अधिक सुलभ पर्याय ठरू शकतात. केवळ १० ते १५ हजार रुपयांच्या अल्प रकमेपासून गुंतवणूक करून देशातील प्राईम लोकेशनवरील मोठ्या व्यावसायिक इमारती, कार्यालये व मॉल्सच्या नफ्यात वाटेकरी बनता येते.

■ याशिवाय, गरज भासल्यास आपली गुंतवणूक त्वरीत पैशात बदलण्याच्या बाबतीतही हे ट्रस्ट उपयुक्त ठरतात. नोंदणीकृत ट्रस्टच्या युनिटस्ची कोणत्याही व्यावसायिक दिवशी शेअर बाजारात सहजरित्या विक्री करून पैसे काढता येतात. याउलट स्वतःचे मालकीचे घर किंवा दुकान विकण्याची क्रिया अत्यंत किचकट असते. योग्य ग्राहक शोधणे, बाजारातील अचूक किंमत ठरवणे, घरावर कर्ज असल्यास बँकेच्या प्रक्रिया पार पाडणे यासाठी बरेच दिवस जातात.

■ फ्लॅट किंवा दुकानातून मिळणाऱ्या भाड्याचा हिशेब केल्यास प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच दिसून येते. मोठ्या शहरांमध्ये कोणत्याही फ्लॅटमधून मिळणारा एकूण परतावा साधारणपणे २ ते ४ टक्के असतो. परंतु, त्यातून प्रॉपर्टी टॅक्स, सोसायटी मेंटेनन्स, तांत्रिक दुरुस्ती खर्च, दलालाची फी आणि घर काही महिने रिकामे राहिल्यास होणारे नुकसान वजा केले, तर प्रत्यक्ष मालकाच्या हातात केवळ १.५ ते २ टक्केच नफा उरतो. यातुलनेत हे ट्रस्ट तब्बल ५ ते ८ टक्के परतावा देतात.

■ भारतीय महसूल बोर्ड आणि सेबीच्या नियमांनुसार या ट्रस्टना नफ्यातील किमान ९० टक्के हिस्सा युनिट धारकांमध्ये वाटणे बंधनकारक असते.

■ सुरुवातीच्या खर्चाचा विचार केल्यास प्रत्यक्ष मालमत्ता खरेदी करताना स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन आणि ब्रोकरेजपोटी ६ ते ९ टक्के अतिरिक्त खर्च करावा लागतो, जो या पर्यायांमध्ये अतिशय नगण्य असतो.

### जोखीम आणि धोक

■ दोन्ही पर्यायांमध्ये वेगवेगळे धोके दडलेले आहेत. सामान्य लोकांचा असा गैरसमज असतो की प्रत्यक्ष मालमत्ता खरेदी करणे पूर्णपणे सुरक्षित असते; परंतु प्रत्यक्षात दोन्हीकडे धोका असतोच. आपण थेट जमीन किंवा फ्लॅट खरेदी करतो, तेव्हा टायटल वाद, मालकी हक्कांचे कायदेशीर प्रश्न, अवैध ताबा, बांधकामास होणारा उशीर, मालमत्तेची गुणवत्ता आणि संपूर्ण भांडवल एकाच ठिकाणी अडकण्याचा धोका असतो. दुसरीकडे, या ट्रस्टचे मूल्य पूर्णपणे शेअर बाजारातील परिस्थितीशी जोडलेले असते. बाजारात मंदीची लाट आली किंवा व्याजदर वाढले तर या ट्रस्टच्या किमती १० ते १५ टक्क्यांपर्यंत घसरू शकतात.

■ थोडक्यात सांगायचे तर, राहण्यासाठी स्वतःचे घर खरेदी करणे ही गरज आणि भावनेशी जोडलेली बाब आहे. परंतु, ज्यांचा मुख्य हेतू संपत्तीत वाढ करणे आणि नियमितपणे पॅसिव्ह इनकम मिळवणे हा आहे, त्यांच्यासाठी हे ट्रस्ट अत्यंत व्यावहारिक ठरतात. ज्या गुंतवणूकदारांकडे मोठी रक्कम उपलब्ध आहे आणि जे दीर्घकाळ मालमत्तेची देखरेख करू शकतात, त्यांच्यासाठी थेट रिअल इस्टेट आजही संपत्ती निर्मितीचा एक सशक्त मार्ग आहे.

---

**मुदत ठेव हा आजही सुरक्षित आणि स्थिर परतावा मिळवून देणारा गुंतवणुकीचा लोकप्रिय पर्याय आहे. विशेषतः जोखीम घेण्याची इच्छा नसलेल्या गुंतवणूकदारांसाठी बँकेतील मुदत ठेव आकर्षक ठरते. मात्र समजा आपल्याकडे १० लाख रुपये आहेत आणि ही रक्कम १० वर्षांसाठी मुदत ठेवीत ठेवायची आहे. अशावेळी संपूर्ण १० लाख रुपयांची एकच मुदत ठेव करावी की १ लाख रुपयांच्या १० स्वतंत्र मुदत ठेवी कराव्यात? असा प्रश्न पडतो. आपण पाहूया याचे अर्थगणित.**

## मुदत ठेव करताय?

समजा १० लाख रुपयांची मुदत ठेव १० वर्षांसाठी ६.५० टक्के वार्षिक व्याजदराने केली आणि व्याजाची गणना तिमाही चक्रवाढ पद्धतीने झाली. तर १० वर्षांनंतर या ठेवीची रक्कम सुमारे १९.०६ लाख रुपये होऊ शकते. म्हणजेच गुंतवलेल्या १० लाख रुपयांवर सुमारे ९.०६ लाख रुपयांचा परतावा मिळू शकतो.



### स्वतंत्र मुदत ठेवींचा परतावा

आता हीच १० लाख रुपयांची रक्कम १ लाख रुपयांच्या १० स्वतंत्र मुदत ठेवींमध्ये विभागली, तरी प्रत्येक ठेवीवर समान ६.५० टक्के व्याजदर, समान कालावधी आणि समान चक्रवाढ पद्धत लागू असल्यास एकूण परतावा जवळपास तितकाच राहील. एका १ लाख रुपयांच्या ठेवीचे १० वर्षांनंतरचे मूल्य सुमारे १.९१ लाख रुपये होईल आणि अशा १० ठेवींचे एकत्रित मूल्य सुमारे १९.०६ लाख रुपये होईल. त्यामुळे केवळ रक्कम विभागल्यामुळे परतावा वाढत नाही. समान व्याजदर आणि समान अटी असतील तर १० लाख रुपयांची एकच ठेव आणि १ लाख रुपयांच्या १० ठेवी यांचा गणिती परतावा जवळपास सारखाच असतो.

### छोटा फरक महत्त्वाचा :

असे असले तरी प्रत्यक्ष गुंतवणुकीत परिस्थिती इतकी सरळ नसते. वेगवेगळ्या बँका वेगवेगळे व्याजदर देतात. त्यामुळे १ लाख रुपयांच्या १० ठेवी वेगवेगळ्या बँकांमध्ये केल्या तर एकूण परतावा बदलू शकतो. उदाहरणार्थ, ५ वर्षे १ दिवस ते १० वर्षे या कालावधीसाठी काही प्रमुख बँकांचे व्याजदर सध्या सुमारे ६टक्के ते ६.५०टक्के या पातळीवर आहेत. त्यामुळे १० वर्षांसाठी ६.५०टक्के दराने १० लाख रुपये गुंतवल्यास रक्कम सुमारे १९.०६ लाख रुपये होऊ शकते; तर ६.०५टक्के दराने तीच रक्कम गुंतवल्यास सुमारे १८.२३ लाख रुपये होऊ शकते. म्हणजेच १० वर्षांच्या दीर्घ कालावधीत व्याजदरातील अगदी छोटा फरकही अंतिम रकमेवर परिणाम करू शकतो.

अर्थात, आजचा व्याजदर पुढील संपूर्ण १० वर्षांसाठी कायम राहीलच असे नाही आणि प्रत्यक्ष परतावा बँकेच्या अटी, चक्रवाढीची पद्धत आणि ठेवीच्या प्रकारावर अवलंबून असेल.

अनेक मुदत ठेवींचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे एफडी लॅडरिंग. सर्व ठेवींची मुदत एकाच दिवशी संपण्याऐवजी वेगवेगळ्या कालावधीसाठी ठेवी करता येतात. यामुळे दरवर्षी किंवा ठराविक कालावधीनंतर काही रक्कम उपलब्ध होते. त्यावेळी गरज असल्यास पैसे वापरता येतात किंवा बाजारातील नवीन व्याजदर पाहून पुन्हा गुंतवणूक करता येते. भविष्यात व्याजदर वाढले तर जुन्या कमी दराच्या ठेवीत संपूर्ण रक्कम अडकून राहण्याची वेळही येत नाही.

---


## प्रश्न मुलांच्या नावाने केलेल्या गुंतवणुकीवरील हक्काचा

अनेक पालक आपल्या मुलांचे भविष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित व्हावे यासाठी ते लहान असतानाच पब्लिक प्रॉव्हिडंट फंड म्हणजेच पीपीएफमध्ये पैसे गुंतवायला सुरुवात करतात. परंतु, अलीकडेच दिल्ली उच्च न्यायालयाने एका प्रकरणात स्पष्ट केले आहे की, अल्पवयीन मुलांच्या नावाने पालकांनी पीपीएफ खाते उघडले असले तरी त्या जमा पैशांवर पालकांचा कायदेशीर मालकी हक्क कधीही असत नाही.

■ या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहिल्यास, सुधीर कवात्रा या वडिलांनी १९९९ मध्ये आपली अल्पवयीन मुलगी शामली हिच्या नावाने एक पीपीएफ खाते सुरू केले होते. बऱ्याच वर्षांपर्यंत या खात्यात पैसे जमा केले गेले. परंतु, २०१६ मध्ये अचानक हे खाते बंद करून त्यातील संपूर्ण रक्कम परस्पर काढून घेण्यात आली. मुलगी सज्ञान झाली आणि तिने या गुंतवणुकीबद्दल माहिती घेतली, तेव्हा पैसे काढल्याचा प्रकार समजला. त्यानंतर मुलीने कायदेशीर लढा सुरू केला. न्यायालयात पालकांनी असा बचाव केला की, त्यांनी मुलीच्या लहानपणी तिच्या पालनपोषणावर आणि शिक्षणावर मोठा खर्च केला आहे. त्यामुळे पीपीएफमधून काढलेली रक्कम त्या खर्चाच्या मोबदल्यात असल्याचे मानले जावे. परंतु, दिल्ली उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला.

■ न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, मुलांचे संगोपन करणे, त्यांना खाऊ-पिऊ घालणे आणि त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलणे ही पालकांची प्राथमिक व कायदेशीर जबाबदारी आहे. या रोजच्या खर्चाची तुलना मुलांच्या भविष्यासाठी निर्माण केलेल्या दीर्घकालीन बचतीशी केली जाऊ शकत नाही. कायदेशीर तरतुदीनुसार, जी व्यक्ती दुसऱ्याच्या हिताची रक्षण करण्यासाठी नेमली जाते, तिला त्या पदाचा गैरवापर करून स्वतःचा फायदा करून घेण्याचा अधिकार नसतो. याच सिद्धांताचा आधार घेत उच्च न्यायालयाने मुलीच्या बाजूने ऐतिहासिक निकाल दिला आणि पालकांना व्याजासह सर्व रक्कम परत करण्याचे सक्तीचे आदेश सुनावले.

या कायदेशीर घडामोडीतून सर्वच पालकांसाठी अनेक महत्त्वाचे संदेश मिळतात. पहिली गोष्ट म्हणजे, कायदेशीर पालक असणे म्हणजे त्या संपत्तीचे मालक असणे नव्हे. पालक




म्हणून आपण मुलांच्या नावे खाते उघडू शकतो, त्याचे संचालन करू शकतो किंवा त्यात पैसे जमा करू शकतो, पण याचा अर्थ असा नाही की अडचण आल्यावर ती रक्कम पालकांनी स्वतःच्या कामासाठी वापरावी. मुलांच्या नावे केलेली प्रत्येक गुंतवणूक ही केवळ आणि केवळ त्या मुलांच्याच भविष्यातील फायद्यासाठी असते.

■ दुसरी बाब म्हणजे, मुलांचा सांभाळ करण्याचा खर्च आणि त्यांच्या नावे केलेली स्वतंत्र गुंतवणूक या दोन पूर्णपणे वेगवेगळ्या गोष्टी आहेत. रोजच्या गरजा भागवणे हे पालकांचे कर्तव्य आहे आणि त्या बदल्यात मुलांच्या नावे भविष्य निर्वाह निधीत साठवलेले पैसे हडप करणे बेकायदेशीर ठरू शकते. अनेकदा पालक मुलांच्या खात्यातील पैसे काढतात आणि नंतर त्याचा योग्य हिसाब ठेवत नाहीत. परंतु या निकालानंतर आता पालकांना अधिक सतर्क राहावे लागणार आहे.

---

## नफा घसरूनही समभागात तेजीची अपेक्षा



भारतीय बाजारातील दिग्गज कंपनी असलेल्या आयटीसी लिमिटेडच्या जून २०२६ मधील तिमाही निकालांमध्ये संमिश्र चित्र पाहायला मिळाले आहे. कंपनीचा एकत्रित निव्वळ नफा मागील वर्षाच्या याच तिमाहीच्या तुलनेत १५.६ टक्क्यांनी घसरून ४ ५०८ कोटी ७९ लाख रुपयांवर आला आहे. मागील वर्षी याच तिमाहीत कंपनीने पाच हजार ३४३ कोटी ४१ लाख रुपयांचा नफा कमावला होता. नफ्यात घट झाली असली तरी कंपनीच्या महसुलात मोठी वाढ नोंदवली गेली आहे. ऑपरेशन्सपासून मिळालेला महसूल २४ हजार १३९ कोटी रुपयांवरून २६ टक्के वाढीसह २० हजार ५२३ कोटी ३० लाख रुपयांवर पोहोचला आहे.

■ उत्पन्नात वाढ झाल्यानंतरही खर्च वाढल्यामुळे नफ्यावर ताण आला आहे. तिमाहीत कंपनीचा एकूण खर्च अठ्ठेचाळीस टक्क्यांनी वाढून २४,८०९ कोटी ९५ लाख रुपयांवर पोहोचला आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली अस्थिरता आणि पुरवठा साखळीतील अडथळे यामुळे कंपनीला आव्हानांचा सामना करावा लागला. याशिवाय सिगारेटवरील उत्पादन शुल्कात झालेली मोठी वाढ कंपनीच्या नफ्यासाठी मुख्य चिंतेचा विषय ठरली आहे.

■ सिगारेट व्यवसायाची कामगिरी या तिमाहीत मंदावल्याने कंपनीच्या नफ्याला मोठा फटका बसला आहे. कर वाढीचा समतोल राखण्यासाठी कंपनीने आपल्या पोर्टफोलिओमध्ये ३० हून अधिक बदल केले आणि टप्प्याटप्प्याने किमतीत वाढ केली. जेपी मॉर्गनच्या मते, सिगारेटचा महसूल अपेक्षेपेक्षा कमी राहिला असून यामुळे नफ्यात १५ टक्क्यांची घसरण झाली आहे. आगामी तिमाहींमध्ये हळूहळू किमती वाढवून परिस्थिती सुधारण्याचा अंदाज ब्रोकरेजने वर्तवला आहे. नोमुरा या ब्रोकरेजने मात्र अधिक सकारात्मक भूमिका घेत आयटीसीचे रेटिंग अपग्रेड केले असून टार्गेट प्राइस ३४० रुपये केली आहे.


■ सिगारेट व्यतिरिक्त इतर एफएमसीजी व्यवसायाने मात्र या तिमाहीत उत्तम कामगिरी करून दाखवली आहे. एफएमसीजी विभागाचा महसूल १५ टक्क्यांनी वाढून सहा हजार ६८७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. पॅकेज्ड फूड, डेअरी, नूडल्स आणि वैयक्तिक काळजी उत्पादनांच्या मागणीत विसा टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली गेली. नोटबुकच्या विक्रीतही जोरदार पुनरागमन झाले असून यामुळे कंपनीच्या नॉन-सिगारेट व्यवसायाला मोठी मजबूती मिळाली आहे.

■ तीन ऑगस्ट २०२६ रोजी आयटीसीचा शेअर २०९ रुपये ३० पैशांवर ट्रेड करत होता. या पातळीवर जेपी मॉर्गन आणि गोल्डमन सॅक्सची भूमिका तटस्थ असली तरी ३८८ रुपयांचे उच्च लक्ष्य ठेवले असून सुमारे ३३ टक्के वाढीची शक्यता वर्तवली आहे. जेफरीज आणि युबीएसने सुद्धा खरेदीचा सल्ला देत ३५० रुपयांचे टार्गेट दिले आहे. कंपनीच्या सिगारेट व्यवसायातील नफा सुधारणे आणि एफएमसीजी क्षेत्रातील वाढीचा वेग कायम ठेवणे हे आगामी काळात शेअरच्या वाटचालीसाठी सर्वात महत्त्वाचे ट्रिगर ठरणार आहेत.

---

## कियोसाकींचे अर्थसूत्र

'रिच डॅड पुअर डॅड' पुस्तकात रॉबर्ट कियोसाकी यांनी संपत्ती निर्मितीचे तेरा महत्त्वाचे नियम सांगितले आहेत जे व्यक्तीला आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यास मदत करतात. या पुस्तकामध्ये गरिबी आणि श्रीमंती या दोन्ही मानसिकतेमधील फरक स्पष्ट करण्यात आला आहे, ज्यानुसार श्रीमंत लोक कधीही पैशासाठी काम करत नाहीत तर पैशाला आपल्यासाठी काम करायला लावतात. जीवनामध्ये योग्य आर्थिक शिक्षण घेण्याचे महत्त्व अत्यंत अधोरेखित करण्यात आले आहे. कारण शाळेमध्ये किंवा कॉलेजमध्ये पैशांचे व्यवस्थापन कसे करावे याचे शिक्षण दिले जात नाही. जेव्हा व्यक्ती पैशाचे गणित शिकते तेव्हा ती सुरक्षित नोकरीच्या शोधात राहण्याऐवजी स्वतःची गुंतवणूक वाढवण्यावर भर देते.




■ या पुस्तकातील पहिल्या महत्त्वाच्या नियमानुसार स्वतःच्या क्षेत्रातील हिरोजना किंवा यशस्वी व्यक्तींना आदर्श मानून त्यांचे अनुकरण केले पाहिजे.

■ दुसऱ्या नियमामध्ये स्वतःला नेहमी आर्थिकदृष्ट्या समृद्ध समजण्याची मानसिकता तयार करण्यास सांगितले आहे

■ तिसरा नियम म्हणजे कधीही मी हे विकत घेऊ शकत नाही असे म्हणू नका, त्याऐवजी मी हे कसे विकत घेऊ शकेन? असा प्रश्न स्वतःला विचारा, ज्यामुळे मेंदू नवनवीन मार्ग शोधू लागतो.

■ चौथा नियम पैशासाठी काम करणे आणि पैसा तुमच्यासाठी काम करणे यातील फरक समजून घेण्याबाबत आहे.

■ पाचवा नियम आर्थिक साक्षरता आणि सामान्य साक्षरता यातील फरक स्पष्ट करतो कारण पुस्तकी ज्ञानापेक्षा पैशाची समज असणे अधिक गरजेचे असते.

■ सहावा नियम विनाशुल्क किंवा अनुभवासाठी काम करून कौशल्य शिकण्यावर भर देतो जे भविष्यात मोठे साम्राज्य उभे करण्यास हातभार लावते.

■ सातव्या नियमानुसार जीवनात यशस्वी होण्यासाठी नेहमी लवकरात लवकर सुरुवात करणे फायदेशीर ठरते कारण वेळेचे चक्र गुंतवणुकीमध्ये खूप मोठी भूमिका बजावते.

■ आठव्या नियमात यशस्वी लोकांकडून आर्थिक शिस्त आणि पैशाचे व्यवस्थापन शिकण्यावर भर दिला आहे जेणेकरून चुका टाळता येतील.

■ नवव्या नियम जगातील संकटांच्या अफवांवर विश्वास ठेवण्यापूर्वी स्वतःचा अभ्यास मजबूत ठेवावा.

■ दहावा नियम आळशीपणावर मात करून सातत्याने कृतीशील रहावे. कारण केवळ विचार करून श्रीमंत बनता येत नाही.

■ अकराव्या नियमात स्वतःमधील अहंकार बाजूला ठेवून इतरांकडून शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे.

■ बाराव्या नियमानुसार राहण्याचे स्वतःचे घर हे कोणतीही संपत्ती किंवा ॲसेट नसून ती एक प्रकारची देणी किंवा लायबिलिटी असते कारण दरमहा त्यातून खर्च वाढतो.

■ तेरावा नियम विलासी वस्तू किंवा चैन सर्वात शेवटी खरेदी करण्यास सांगतो जेव्हा तुमच्या संपत्तीतून मिळणारे उत्पन्न त्या वस्तूंचा खर्च भागवू शकते.

---

## आयटीआर भरणार आहात ना?

आयकर विभागाच्या वतीने करदात्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली असून, आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी (आकलन वर्ष २०२६-२७) आयकर रिटर्न दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ निश्चित करण्यात आली आहे. ज्या करदात्यांचे उत्पन्न व्यवसाय किंवा पेशा मधून येते आणि ज्यांच्या खात्यांचे अंकेक्षण किंवा ऑडिट करण्याची आवश्यकता नाही, अशा व्यक्तींसाठी ही मुदत लागू होते.




● या श्रेणीमध्ये आयटीआर-३, आयटीआर-४, आयटीआर-५ आणि आयटीआर-७ या रिटर्न फॉर्मचा समावेश होतो. मुदत संपण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने करदात्यांनी वेळेत आपले रिटर्न दाखल करणे आवश्यक आहे.

● ज्या व्यक्ती किंवा घटकांना व्यवसाय किंवा व्यावसायिक उत्पन्न आहे आणि ज्यांना टॅक्स ऑडिट लागू नाही, त्यांना ३१ ऑगस्टपर्यंत रिटर्न फाईल करावे लागेल. यामध्ये काही वैयक्तिक करदाते, हिंदू अविभक्त कुटुंबे, फर्म्स आणि इतर कायदेशीर संस्थांचा समावेश होतो. प्रत्येक करदात्याने आपल्या उत्पन्नाचे स्वरूप, उत्पन्नाचे स्रोत आणि कायदेशीर वर्गवारीनुसार योग्य तो आयटीआर फॉर्म निवडणे बंधनकारक आहे.

● वेगवेगळ्या वर्गासाठी लागू होणारे फॉर्म्स खालीलप्रमाणे आहेत. आयटीआर-३ हा फॉर्म प्रामुख्याने अशा व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंबांसाठी आहे, ज्यांना व्यवसाय किंवा पेशापासून उत्पन्न मिळते. यामध्ये पगाराचे उत्पन्न, भांडवली नफा किंवा घरमालकीच्या उत्पन्नासह व्यावसायिक उत्पन्नाचाही समावेश असू शकतो.

● आयटीआर-४ हा फॉर्म निवासी व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंबे आणि मर्यादित दायित्व भागीदारी व्यतिरिक्त असलेल्या फर्म्ससाठी आहे, जे अनुमानात्मक कर आकारणी योजनेच्या अटी पूर्ण करतात.

● आयटीआर-५ हा फॉर्म फर्म्स, एलएलपी, व्यक्तींचे संघ, संस्था आणि इतर विशिष्ट घटकांद्वारे वापरला जातो.

● आयटीआर-७ हा फॉर्म प्रामुख्याने ट्रस्ट, संस्था आणि कायद्याच्या विशिष्ट तरतुदींनुसार रिटर्न दाखल करणे आवश्यक असलेल्या व्यक्तींसाठी लागू होतो.

● ३१ ऑगस्टच्या मुदतीत रिटर्न दाखल न केल्यास करदात्यांना विलंबाचे शुल्क, व्याज आणि इतर कायदेशीर दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे वेळेत रिटर्न भरणे फायदेशीर ठरते.

● रिटर्न फाईल करताना करदात्यांनी फॉर्म २६ ए एस, ॲन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट आणि टॅक्सपेयर इन्फॉर्मेशन समरीमधील माहिती पडताळून पाहावी, जेणेकरून उत्पन्नाची आकडेवारी आणि कर क्रेडिट जुळतील. शेवटच्या दिवसां पोर्टलवर येणारा तांत्रिक ताण टाळण्यासाठी करदात्यांनी लवकरात लवकर कागदपत्रे तयार करून ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करावी आणि सबमिट केल्यानंतर ई-व्हेरिफिकेशन करायला विसरू नये, असे आवाहन आयकर विभागाने केले आहे.

---


## पार्किंग केलेल्या वाहनाचे नुकसान झाल्यास...

■ विमाजगत

**शहरांमधील वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे पार्किंगची समस्या गंभीर झाली आहे. अशा परिस्थितीत रस्त्यावर किंवा असुरक्षित ठिकाणी गाडी उभी केल्यास होणाऱ्या नुकसानाबाबत वाहनविम्याचे नियम काय आहेत, हे प्रत्येक वाहनधारकाने समजून घेणे महत्त्वाचे आहे.**

● जेव्हा एखादी गाडी पार्किंगच्या ठिकाणी किंवा रस्त्याच्या कडेला उभी असताना चोरीला जाते किंवा तिचे नुकसान होते, तेव्हा 'कॉम्प्रिहेन्सिव्ह इन्शुरन्स' असणे खूप गरजेचे असते. केवळ थर्ड पार्टी विमा असल्यास अशा प्रकारच्या नुकसानाची भरपाई मिळत नाही. जर गाडीचा अपघात झाला किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले, तर विमा कंपनीकडे दावा दाखल करताना 'एफआयआर' किंवा स्थानिक पोलीस तक्रार अहवाल असणे अनिवार्य आहे.






● विशेषतः चोरीच्या बाबतीत, पोलीस तक्रार दाखल केल्यानंतर विमा कंपनीला त्वरित माहिती देणे आवश्यक असते. नैसर्गिक आपत्तींचा विचार करता, पावसाळ्यात अनेक शहरांमध्ये पाणी साचल्यामुळे गाड्यांचे नुकसान होते. अशा वेळी 'इंजिन प्रोटेक्शन कव्हर' आणि 'वॉटर डॅमेज कव्हर' यांसारख्या ॲड-ऑन कव्हरेजचे महत्त्व वाढते. अनेकदा पार्किंगमध्ये पाणी भरल्यामुळे इंजिनमध्ये पाणी शिरते आणि गाडी बंद पडते. सामान्य विमा पॉलिसीमध्ये इंजिनच्या नुकसानासाठी कव्हर नसते, त्यामुळे हे ॲड-ऑन घेणे फायदेशीर ठरते. पूर किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानासाठी विमा कंपनीला पुरावा म्हणून फोटो किंवा व्हिडिओ देणे गरजेचे असते.

● पार्किंगच्या जागेची निवड करतानाही काळजी घेणे आवश्यक आहे. जर तुमची गाडी अधिकृत पार्किंगमध्ये उभी असेल आणि तिथे काही दुर्दैवी घटना घडली, तर विम्याचा दावा मिळणे सोपे जाते. मात्र, जर गाडी 'नो पार्किंग' झोनमध्ये उभी असेल आणि त्याचे नुकसान झाले, तर विमा कंपनी दाव्याची प्रक्रिया कडक करू शकते किंवा काही प्रकरणांत दावा नाकारला जाऊ शकतो. त्यामुळे नेहमी सुरक्षित आणि अधिकृत जागेवरच गाडी पार्क करण्याचा प्रयत्न करावा.

● विमा कंपनीला माहिती देताना विलंब करू नका. नुकसान झाल्याच्या २४ ते ४८ तासांच्या आत कंपनीला कळवणे महत्त्वाचे असते. दाव्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, जसे की विमा पॉलिसीची प्रत, ड्रायव्हिंग लायसन्स, गाडीचे आरसी बुक आणि पोलिसांची तक्रार, व्यवस्थित तयार ठेवा. शेवटी, २०२६ च्या धोरणांनुसार गाडीच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते. त्यामुळे आपल्या विम्याच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचाव्यात आणि आवश्यक असल्यास 'रिटर्न टू इनव्हॉइस' किंवा 'झिरो डेप्रिसिएशन' सारखे कव्हर्स समाविष्ट करून घ्यावेत. यामुळे केवळ आर्थिक फटका बसत नाही तर मनःशांतीही मिळते. अधिकृत नियमांसाठी आणि अपडेट्ससाठी तुमच्या विमा कंपनीच्या वेबसाईटला किंवा अधिकृत एजंटशी संपर्क साधून माहिती घेणे नेहमीच हिताचे असते.

# आनंदऋषीजी नेत्रालय येथे लवकरच नेत्रपेढी उभारण्यात येणार

## डॉ. प्रकाश कांकरिया यांचे प्रतिपादन



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया समवेत डॉ. प्रतीक कटारिया, डॉ. वसंत कटारिया व इतर.

## नेत्र शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ५५० रुग्णांची तपासणी

नगर – कत्तलखान्याच्या जागेवरील आरक्षण काढून आरोग्य मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. यासाठी समाजाने मोठा पाठिंबा दिला आहे.मानवसेवा व देशसेवा करण्याच्या उद्देशानेच आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य सुरू आहे. गेल्या आठ वर्षांपासून आनंदऋषीजी नेत्रालयाची नेत्रदीपक कामगिरी सातत्याने सुरू असून,आतापर्यंत दीड लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत.नेत्रालयाचा नावलौकिक महाराष्ट्रासह देशभरात झाला आहे. समाजातील गोरगरीब व गरजू रुग्णांना मोफत व अल्पदरात नेत्रसुविधा देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.आज सम ाजाला नेत्रपेढीची गरज आहे. आनंदऋषीजी नेत्रालयात तज्ज्ञ व निष्णात डॉक्टरांची टीम कार्यरत आहे.येणाऱ्या वर्षात लवकरच येथे नेत्रपेढीची उभारणी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त स्व. कन्हैयालालजी व स्व. मानकंवरबाई कांकरिया यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ.प्रकाश कांकरिया, सौ.डॉ.सुधाताई कांकरिया व कांकरिया परिवार यांच्या वतीने नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पियुष बाफना (धुळे), सचिन बांठिया (पनवेल), जैन सोशल फ ेडरेशनचे सदस्य डॉ.वसंत कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, शिबिराचे तज्ज्ञ डॉक्टर –डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ.अशोक महाडिक, डॉ.संदीप राणे, डॉ. प्रतीक कटारिया, डॉ.विशाल तांबे, डॉ.किरण शिंदे, डॉ.नेहा भराडिया, डॉ.केतन राठोड, डॉ.विवेक पाऊलबुद्धे, डॉ. नलिनी गीते, डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ.निरंजन पेहेरे, डॉ. पूनम लंकेश्वर यांच्यासह सुरज शिनगारे, किरण कवडे आदी उपस्थित होते.

डॉ. सुधाताई कांकरिया म्हणाल्या, अनुभवसंपन्नता, कौशल्य व गुरुदेवजींचा आशीर्वाद यामुळे नेत्रालयातील शस्त्रक्रिया यशस्वी होत आहेत. जीवनात आरोग्यसंपन्नता आणण्यासाठी डोळे हे महत्त्वाचे इंद्रिय आहे. डोळे निरोगी असल्यास आपण व्यवसाय करू शकतो, सहजतेने वावरू शकतो तसेच आनंदी जीवन जगू शकतो. डोळ्यांअभावी मानवाचे जीवन अत्यंत कठीण असते. असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी याप्रमाणे प्रत्येकाला चांगली दृष्टी मिळावी, यासाठी स्व. मानकंवरबाई कांकरिया व स्व. कन्हैय्यालाल कांकरिया या माता–पित्यांना वंदन करत साईसूर्य नेत्रसेवा व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात ज्यांना गरज आहे त्यांची शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, अनेकांना दृष्टी भेट देण्यात येणार आहे.

नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रतीक कटारिया म्हणाले, आनंदऋषीजी नेत्रालयामध्ये १ लाख ५० हजार रुग्णांच्या शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या आहेत. तसेच २५ व्हिजन सेंटरमार्फत शेजारच्या सहा जिल्ह्यांमध्ये नेत्रालयाचे काम सुरू आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना आणण्यासाठी बसची सुविधा आहे.तसेच ऑपरेशन केलेल्या रुग्णांना औषधे, लेन्स व काळा चष्मा मोफत या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. पैशाअभावी कोणताही रुग्ण वंचित राहू नये यासाठी आनंदऋषीजी नेत्रालय कार्य करीत आहे. तसेच तारकपूर येथे नेत्रालयाची शाखा एक वर्षापासून सुरू आहे. येथे एका वर्षात दहा हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली असून ४५० रुग्णांच्या यशस्वीपणे नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. येथे २८ डॉक्टरांची टीम कार्यरत असून बालकांच्या नेत्र शस्त्रक्रिया व रेटिना सारख्या अवघड शस्त्रक्रिया आधुनिक पद्धतीने व उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात येत आहेत.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले, डोळ्याचे डॉक्टर म्हटले की, डॉ. प्रकाश कांकरिया हेच समीकरण बनले आहे.डॉ.प्रकाश कांकरिया व डॉ. सुधाताई कांकरिया यांचे आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणी व तसेच वर्धमान महावीर युनिव्हर्सिटी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातही मोलाचे योगदान लाभत आहे. गेल्या पंचवीस वर्षांतील आनंदऋषीजी हॉस्पिटल व नेत्रालयाच्या आठ वर्षांच्या प्रगतीत डॉ.कांकरिया यांचे मोठे योगदान लाभले आहे. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक स्व. कन्हैयालाल कांकरिया व स्व. मानकंवरबाई कांकरिया यांचा वारसा लाभल्याने कांकरिया परिवार सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. आनंदऋषीजी नेत्रालय अहिल्यानगर जिल्ह्यासह मराठवाडा, बीड, संभाजीनगर अशा अनेक ठिकाणी असलेल्या गरजू रुग्णांसाठी नेत्रसेवा उपलब्ध करून देत आहे. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त रुग्णांनी घ्यावा. या नेत्ररोग तपासणी शिबिरात ५५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन वसंत चोपडा यांनी केले. तर आभार सतीश लोढा यांनी मानले.



# गुरुवाणी – २८

## असंगाशी संग नको...

'आश्रव पुण्य का भी हो सकता है और पाप का भी हो सकता है'. शरीरानेही पुण्य किंवा पापाचा आश्रव होतो. मन, काया आणि वचन योग या तीन गोष्टी सगळ्यांना भेटल्यात. या तीन फॅक्टरीत तुम्ही काय घेता आणि काय रोखता हे महत्त्वाचे आहे. मन, वचन, काया मध्ये फक्त 'पुण्य' आश्रव झाले तर पूर्वजन्मीचे कोणतेही 'कर्म' बदलतात. सुगंध येताच दुर्गंधी निघून जाते. अर्जुन मालीने मन, वचन कायाद्वारे अशुभ आश्रव होऊच दिला नाही. याचा परिणाम म्हणजे, त्याने केलेल्या हत्यांच्या पापाची निर्जरा झाली. इतरांना दिल्याने पाप व पुण्याचे आश्रव होतो. तुम्ही काय देता हे महत्त्वाचे आहे. अन्नदान केले तर पुण्य आश्रव होईल. मनात दुसऱ्याप्रती मंगल भावना असली तर पुण्य कर्म होते. काही न करता दुसऱ्या प्रती मनात चुकीचा भाव ठेवला तरी पापाचा आश्रव होतो. एका चुकीच्या वाक्याने 'महाभारत' घडलं. तुमचे बोलणं जेव्हा समोरच्याला वरदान वाटेल तेव्हा तुम्हालाही समोरून वरदानच मिळेल. तुम्ही कोणता आश्रव करणार, कोणाच्या सान्निध्यात राहायचे हे तुमच्या हातात असते. तुमची इच्छा नसली तरी केवळ चुकीच्या संगतीत असल्यामुळे तुमच्यात चुकीचा आश्रव होतो. इसापनीतीतील कथा आहे. कावळा आणि हंसाची मैत्री होते. एकेदिवशी दोघे झाडावर बसलेले असतात. झाडाखाली एक शिकारी झोपलेला असतो. त्याच्या तोंडावर ऊन पडत होत. हंस पाहतो आणि आपले पंख पसरवून शिकाऱ्याच्या चेहऱ्यावर सावली पाडतो. कावळा हे पाहतो आणि गुपचूप शिकाऱ्याच्या चेहऱ्यावर विष्ठा करून उडून जातो. हंसाला हे काहीच माहिती नसते. शिकारी खडबडून जागा होतो व त्याला वर फक्त हंस दिसतो. तो रागाने बाण मारतो व हंस खाली पडतो. म्हणूनच म्हणतात, 'असंगाशी संग प्राणाशी गाठ'. संगत खूप महत्त्वाची असते. गुरूदेवांच्या कृपेचा आश्रव केला म्हणून मी आज इथं आहे. माझे संपूर्ण आयुष्य बदलले, डीएनए बदलला. घरात कशाचा आश्रव करायचा हे तुम्हीच निश्चित करू शकता. गौतम निधीचा कार्यक्रम तुमच्यातील 'दाता' जागृत करण्याचा कार्यक्रम आहे. 'जो दाता नही वो भगवान नही'. आपल्यातील भगवंत जागा करा.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



# गुरुवाणी – २९

## तुमच्यातील 'श्रद्धा' श्रीमंत करा

आपण राग, कपट, अहंकार, लोभ करतो कारण आपण ते ग्रहण केलेले असते. कळत नकळत ग्रहण करणे हाच आश्रव आहे. त्याचे परिणाम कधी ना कधी दिसणारच. अर्जुन माली मुद्गरपाणि यक्षाची भक्ती करायचाय, त्याच्या कुळाची ही परंपरा होती. तो भावपूर्वक भक्ती करायचा. त्याने कधी विचार केला नसेल की तो स्वतः एक दिवस मुद्गरपाणि बनेल. तो आस्थापूर्वक ग्रहण करत राहिला. आज तुम्ही मोबाईल, टिव्ही द्वारे सतत ग्रहण करत असता. त्याचे परिणाम निश्चितच येणार. जर बाजारात गुटखा, मद्य, सिगारेटच्या जाहिराती बंद झाल्या तर त्याचे सेवन खूप कमी होऊ शकते. कारण आपण जाहिरात फक्त पाहत नसतो तर ग्रहण करत असतो. जोपर्यंत केवल ज्ञान होत नाही, तोपर्यंत इंद्रियांद्वारे २४ तास आश्रव होत राहील. पण त्याचवेळी 'बंध' लिमिटेड असतो. तुमचा तुमच्या घरावर अधिकार जास्त आणि त्याचा उपयोग कमी आहे. अधिकारातून बंध होतो. तीर्थंकर परमात्मा ऐश्वर्यशाली समवशरणमध्ये विराजमान असतात पण त्यांचा बंध होत नाही, कारण ते अधिकार ठेवत नाहीत. नवकार मंत्र भूतकाळातील पाप समाप्त करतो आणि भविष्यातील मंगल निर्माण करतो. कोणाला नमन करता, त्यावर आश्रव होतो. सुंदर भाव ठेवून नमन म्हणजे समोरच्याची सकारात्मक ऊर्जा ग्रहण करणे. अपमान कराल तर समोरच्याची नकारात्मक ऊर्जा ग्रहण होईल. बाबा आमटेंची एक सुंदर कविता आहे, देहाचे कुष्ठरोगी आनंदवन फुलवतात पण मनाचे कुष्ठरोगी उलट करतात. शरीर, मन कसेही असो कायम 'मंगल भाव' ठेवा. आज नाही तर उद्या मन, वचन, कायाही बदलेल. तीर्थंकरांनी चंडकौशिकचा 'भाव' बदलला आणि सगळेच बदलले. तुम्ही कायम तीर्थंकरांचा असाच आश्रव केला तर जीवनात कायम सुगंध दरवळेल. यावर्षी सर्वांनी पयुर्षण पर्वाचा आश्रव करायचा आहे. असा आश्रव करा की तुमच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला तुमच्या श्रद्धेचा आश्रव होईल. तुमच्यातील 'श्रद्धा' श्रीमंत करा आणि 'कषाय' गरीब करा. ज्याचे जे श्रीमंत आहे, तो त्याचा उत्सव करतो. पर्युषण पर्व 'संयम'चा उत्सव आहे. पाचही इंद्रिये सतत आश्रव करत असतात. 'नफरत से पाप का आश्रव होता है और प्रेम से पुण्य का आश्रव होता है'.

**– उपाध्याय प्रवर पू.श्री.प्रविणऋषिजी म. सा.**

# गाव तेथे शाखा निर्माण करण्याचा समता सैनिकांचा मेळाव्यात निर्धार

नगर – भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर दक्षिण प्रणित शहर व तालुका शाखेच्या वतीने जिल्हा शाखेच्या आदेशानुसार समता सैनिक मेळावा नालंदा बुद्ध विहार, अहिल्यानगर येथे झाला. मेळाव्यात गाव तेथे शाखा निम ाण करण्याची प्रतिज्ञा सर्व कार्यकर्त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भगवंतराव गायकवाड होते. मेळाव्यात समता सैनिक दलाच्या कार्यासंदर्भात विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समता सैनिक दलाचे सहउपाध्यक्ष अमोल गायकवाड यांनी केले. यावेळी लक्ष्मण माघाडे, प्रकाश कांबळे, दीपक अमृत, गोरख केदारे व किशोर कांबळे यांनी मार्गदर्शन केले. गोरख केदारे व दीपक अमृत यांनी समता सैनिक दलाच्या गरजू सैनिकांना प्रत्येकी पाच गणवेश देण्याची घोषणा केली. तसेच संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड यांनी सैनिकांना पाच जोड बूट, तर तालुका कोषाध्यक्ष सुभाष कांबळे यांनी पाच सैनिकी टोप्या देण्याचे जाहीर केले.

जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सेक्रेटरी सतीश ओहोळ, कोषाध्यक्ष विजय हूसळे, कार्यालयीन सचिव गौतम पाचारणे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष गायकवाड, जिल्हा सचिव गोरख केदारे व सहसचिव किशोर कांबळे यांनी उपस्थितांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

समता सैनिक दल ही काळाची गरज आहे. प्रत्येक सैनिकाने काळाची पावले ओळखून कार्य केले पाहिजे. ज्या महामानवाने समाजाला मानसन्मान व हक्काचे जीवन मिळवून दिले, त्या आंबेडकर घराण्याच्या संरक्षणासाठी आपण कटिबद्ध राहिले पाहिजे. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड व बुवाबाजी दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन भगवंतराव गायकवाड यांनी केले.

मेळाव्यास तालुकाध्यक्ष नितीन साळवे, उपाध्यक्ष अमोल गायकवाड, सेक्रेटरी अविनाश राक्षे, कोषाध्यक्ष सुभाष कांबळे, केंद्रीय शिक्षक गौतम हंबर्डे, संघटक परमेश्वर गायकवाड, विजीतकुमार ठोबे, पर्यटन सचिव विशाल गायकवाड, संरक्षण सचिव सुनील अशोक पंचमुख, संघटक सुनील साहेबराव पंचमुख, कार्यालयीन सचिव अरुण गायकवाड, संघटक रंगनाथ माळवे, सैनिक दीपक गायकवाड, संघटक कचरू थोरात, नरेश खडसे, शहराध्यक्ष दीपक पाटोळे, संघटक सचिन कांबळे उपस्थित होते. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. तालुकाध्यक्ष नितीन साळवे यांनी आभार मानले.



शिक्षणधिकारी संध्याताई गायकवाड यांनी स्वतःची ठेव ठेवून माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या ऐच्छिक ठेव वाढ अभियानाचा प्रारंभ केला.

# माध्यमिक शिक्षक सोसायटीत ऐच्छिक ठेव वाढ अभियान

## शिक्षणाधिकारी यांनी स्वत:ची ठेव ठेऊन केला अभियानाचा प्रारंभ

नगर – अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटी स्वभांडवली करण्याचा संकल्प घेऊन तसेच कर्जाचे व्याजदर कमी करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या ऐच्छिक ठेव वाढ अभियानाचा शुभारंभ शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. सोसायटीचे चेअरमन तथा शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे आणि व्हाईस चेअरमन तथा शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप यांच्या संकल्पनेतून या अभियानाला प्रारंभ झाला. यावेळी शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड यांच्यासह चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि संचालकांनी स्वतः ठेवी ठेवून अभियानाचा शुभारंभ केला.

या प्रसंगी सहकार आयुक्त कार्यालयाचे सेवानिवृत्त अधिकारी सतीश ढमाल, माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, माजी व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, संचालक महेंद्र हिंगे, सुनील दानवे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, विजय पठारे, अतुल कोताडे, बाजीराव अनभुले, शिवाजी लवांडे, छबू फुंदे, साहेबराव रक्टे, किशोर धुमाळ, संभाजी गाडे, बाळाजी गायकवाड, सुधीर कानवडे, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ, शिक्षक सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह अमोद नलगे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात चेअरमन बाबासाहेब बोडखे म्हणाले की, आमची सत्ता आली तेंव्हा जिल्हा सहकारी बँकेची मागच्या मंडळाच्या कारकिर्दितील सुमारे १५८ कोटी रुपयांची कॅश क्रेडिटची उचल होती. त्याला १२.५ टक्के व्याजदर व कर्जाचा ७ टक्के व्याजदर होता. मात्र नियमबाह्य कामकाज थांबवून आणि काटकसर करून मागील दीड वर्षात कॅशक्रेडीटची ७२ कोटी रुपयांवर आणल्याचा दावा त्यांनी केला. संस्था स्वभांडवली करण्याच्या उद्देशाने पावले उचलली जात आहेत. शैक्षणिक चळवळीतले पदाधिकारी संचालक म्हणून काम करत असताना सभासदांचे व संस्थेचे हित समोर ठेवून दूरदर्शीपणे कारभार करत आहेत. सध्याचे कर्जाचे व्याजदर न वाढविता ऐच्छिक ठेव वाढ अभियानाच्या माध्यमातून व्याजदर देखील कमी करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे बोडखे यांनी स्पष्ट केले. जिल्हा बँकेकडून १२.५ टक्क्यांनी घेतलेले सीसी कमी झाल्यास कर्जाचे व्याजदरदेखील कमी करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठीच ऐच्छिक ठेवीचा व्याजदर आम्ही ७.५० टक्के केलेला आहे. त्यामुळे सर्वांच्या ऐच्छिक ठेवी नक्कीच वाढतील.

माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे म्हणाले, संस्थेला २५ वर्षांनंतर ऊर्जित अवस्थेत आणण्याचे काम परिवर्तन मंडळाचे सर्व संचालक योगदान देत आहेत. मुलींचे होस्टेल तयार करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे जागेसाठी पाठपुरावा सुरू आहे. तसेच सोसायटीच्या तिसऱ्या मजल्यावर स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिकेचे काम सुरू असून, यामध्ये सभासदांच्या पाल्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर कानवडे यांनी केले. आभार महेंद्र हिंगे यांनी मानले.

# राज्यस्तरीय कुराश कुस्ती स्पर्धेत नगरच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

## १९ खेळाडूंना सुवर्ण, एकाला रौप्य; २० जणांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



कुराश स्पर्धेतील विजेत्यांचा आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

नगर – महाराष्ट्र राज्य कुस्ती संघटनेच्या वतीने अहिल्यानगर येथील वाडिया पार्क क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कुराश कुस्ती स्पर्धेत नगर शहरातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. विविध वजन गटांमध्ये तब्बल १९ खेळाडूंनी सुवर्णपदक, तर एका खेळाडूने रौप्यपदक पटकावले. या गुणवंत खेळाडूंचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर नगर शहरातील विविध वजन गटांमधील २० खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. येत्या ५ व ६ सप्टेंबर रोजी पंजाबमधील लुधियाना येथे राष्ट्रीय स्पर्धा होणार असून, या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना मान्यवरांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशिक्षक प्रा. संजय धोपावकर, प्रा. माणिक विधाते, पैलवान अनिल वाणे, आदित्य धोपावकर, शुभम दातरंगे, युवराज करंजुले, गोरख खंडागळे, अथर्व नरसाळे, निलेश मदने, प्रकाश बल्लाळ, प्रा. संजय दत्त आदींसह खेळाडू व पालक उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, खेळाच्या माध्यमातून शरीराचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होते. मात्र दिवसेंदिवस मैदानी खेळ कमी होत चालले आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मैदानी खेळांकडे वळविणे गरजेचे असून, त्यांना दर्जेदार मैदान आणि चांगले प्रशिक्षक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्पर्धांच्या माध्यमातूनच खेळाडू घडत असतात, असे आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी सांगितले.

प्रशिक्षक प्रा. संजय धोपावकर म्हणाले, अहिल्यानगर शहरात राज्यस्तरीय कुराश कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध वजन गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या २० खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे. येत्या ५ व ६ सप्टेंबर रोजी पंजाबमधील लुधियाना येथे राष्ट्रीय स्पर्धा होणार आहे.

विविध गटांमध्ये सुवर्णपदक पटकावलेल्या वेद अरकल, विहान उदगीरकर, श्लोक सब्बन, पार्थ दातरंगे, मल्हार सुरसे, शिवतेज खंडागळे, विराट करंजुले, सम्राट करंजुले, ओम प्रकाश दहिफळे, ओम पोकळे, अन्वी अंदे, आर्या शिंदे, आरोही लखापती, स्वरा डहाळे, आराध्या बल्लाळ, ऋचा बोगा, सिद्धी दातरंगे, अनुज बोगा आणि युवराज आव्हाड यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रौप्यपदक विजेता यशराज गोंधळे याचाही आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार करून पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# सारडा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांचे रक्तदान

नगर – सारडा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांनीही रक्तदान केले.

प्रारंभी पेमराज सारडा महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी व जनकल्याण रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री यांच्या हस्ते या शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी सारडा महाविद्यालयाचे कनिष्ठ विभागचे चेअरमन मधुसूदन सारडा, अजित बोरा व ब्रिजलाल सारडा, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, जनकल्याणचे कार्याध्यक्ष सतीश इंदाणी, संचालक आदित्य चांदेकर, एनएसएसचे कार्यक्रम प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ.विलास मढीकर उपस्थित होते.

कोठारी म्हणाले, रक्तदान शिबिरांमुळेच रक्ताचे संकलन होत असून रक्ताचा भासणारा तुटवडा कमी होतो. सारडा महाविद्यालयातील विद्यार्थी कर्तव्याच्या भावनेने दरवर्षी उत्स्फूर्तपणे रक्तदान शिबिरात भाग घेत दानशूर झाले आहेत.

मधुसूदन सारडा म्हणाले, जगात सर्वात अद्ययावत एआय तंत्रज्ञान आले असले तरी अद्याप रक्ताचा शोध कोणीही लावू शकले नाहीये. मानवच मानवाच्या मदतीला यावा यासाठी एकाचे रक्त दुसऱ्याला चालते. गरजूंना संजीवनी ठरलेल्या रक्तदान शिबिरात सर्वांनी सहभागी व्हावे.

यावेळी सतीश इंदाणी यांनी जनकल्याण रक्तपेढीच्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले. प्रा. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विलास मढीकर यांनी आभार मानले.

# गुलाटी मोटर्समध्ये सत्ते पे सत्ता लकी ड्रॉ ऑफर



एमआयडीसीतील गुलाटी मोटर्समध्ये लकी ड्रॉमधील विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

नगर – अशोक लेलँड कंपनीने ७ लाख ग्राहकांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केल्याच्या निमित्ताने एमआयडीसीतील गुलाटी मोटर्स यांच्या वतीने ग्राहकांसाठी सत्ते पे सत्ता लकी ड्रॉ ऑफर सुरू करण्यात आली आहे. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत नवीन वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना वाहनासोबत आकर्षक बक्षिसे जिंकण्याची सुवर्णसंधी मि ळत आहे.

या खास ऑफरमध्ये ग्राहकांना बाईक, टीव्ही, वॉशिंग मशीन, फ्रिज, व मिक्सर, स्मार्ट वॉच यासह इतर आकर्षक बक्षिसे जिंकता येणार आहेत. त्यामुळे अशोक लेलँडची गाडी खरेदी करा आणि बक्षिसांची लयलूट करा, असा उत्साह गुलाटी मोटर्समध्ये पाहायला मिळत आहे.

नुकत्याच झालेल्या लकी ड्रॉमध्ये श्रीकांत लांडे – टीव्ही, ज्ञानदेव ठुबे – वॉशिंग मशीन, विजय रोह्ला – टीव्ही, संजय धस – टीव्ही आणि गोरख निकम – वॉशिंग मशीन या भाग्यवान ग्राहकांनी बक्षिसे पटकावली आहेत. या प्रसंगी गुलाटी मोटर्सचे संचालक विशाल गुलाटी, अशोक लेलँडचे टेरिटरी मॅनेजर वैभव तनेजा, गुलाटी मोटर्सचे सेल्स मॅनेजर अभिषेक खेडकर तसेच गुलाटी मोटर्सचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

सत्ते पे सत्ता या ऑफरची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट आहे. नवीन अशोक लेलँड वाहन खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांनी वेळ न दवडता गुलाटी मोटर्स, एमआयडीसी, अहिल्यानगर येथे भेट देऊन या खास ऑफरचा लाभ घ्यावा.

